महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला यांचे कार्यालय,
जिल्हा सहकारी भूविकास बँक, मुख्य कार्यालय, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, अकोला

जा.क्र.उपनि-अको/वि-१/सावकारी/सोमाणी वि. झवर/ ५५७ /२०२६,          दिनांक :- ०६/ ०४ /२०२६

**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) अन्वये चौकशी अहवाल**

१. श्री. प्रकाश जानकीराम सोमाणी,
२. सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी,
रा. सोमाणी अपार्टमेंट, रामदास पेठ, ता. जि. अकोला. ... **अर्जदार**

**:: विरुध्द ::**

१. श्री. विनोद हरगोविंदजी झवर,
रा. "श्री व्यंकटेश" मुकूंद मंदिराजवळ, रामदास पेठ, ता. जि. अकोला.
२. श्री. कार्तीक विजय साव,
रा. कामा प्लॉट, स्टेशन रोड, ता. जि. अकोला. ... **गैरअर्जदार**

ज्याअर्थी, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांचेकडे दि. ०१.०४.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) अन्वये आदेश क्र. सावकारी/अकोला/अ.साव/प्रजा सोमाणी/१७१७/२०२१, दि. ०८.०७.२०२१ नुसार या कार्यालयास महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ व महाराष्ट्र सावकारी (नियमन) नियम २०१४ मधील तरतुदीन्वये चौकशी करुन त्याबाबतच सविस्तर अहवाल सादर करणेकामी प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, सदर तक्रार अर्ज प्राप्त झाले नंतर या कार्यालयाने संबंधीतांना सुनावणीची संधी देवून प्रथम सुनावणी दि. ०१.०९.२०२१ व त्यानंतर दि. १५.०९.२०२१, २९.०९.२०२१, १४.१०.२०२१, ०३.११.२०२१, २४.११.२०२१, १५.१२.२०२१, ०५.०१.२०२२, १८.०१.२०२२, १०.०२.२०२२, ०२.०३.२०२२, २३.०३.२०२२, २०.०४.२०२२, ११.०५.२०२२, ०१.०६.२०२२, २४.०६.२०२२, ०६.०७.२०२२, २९.०७.२०२२, ०९.०९.२०२२, २९.०९.२०२२, १९.१०.२०२२, १६.११.२०२२, ०१.१२.२०२२, १६.१२.२०२२, १२.०१.२०२३, ३१.०१.२०२३, १७.०२.२०२३, १०.०३.२०२३, १३.०४.२०२३, ११.०५.२०२३, २६.०५.२०२३, ०८.०६.२०२३, १४.०६.२०२३, २३.०६.२०२३, १२.०७.२०२३, २६.०७.२०२३, ०८.०८.२०२३, २३.०८.२०२३, ०१.०९.२०२३, ०८.०९.२०२३, ०४.१०.२०२३, १६.१०.२०२३, ०६.११.२०२३, २०.११.२०२३, ०४.१२.२०२३, ११.१२.२०२३, १८.१२.२०२३, ०८.०१.२०२४, १५.०१.२०२४, १२.०२.२०२४, २६.०२.२०२४, ११.०३.२०२४, ०८.०४.२०२४, २९.०४.२०२४, ०८.०५.२०२४, १६.०५.२०२४, २७.०५.२०२४, १०.०६.२०२४, १८.०६.२०२४, २४.०६.२०२४, १५.०७.२०२४, २२.०७.२०२४, १२.०८.२०२४, ३०.०८.२०२४, ०९.०९.२०२४, २३.०९.२०२४, ०७.१०.२०२४, २१.१०.२०२४, २५.११.२०२४, ०९.१२.२०२४, २३.१२.२०२४, ०६.०१.२०२५, १३.०१.२०२५, २०.०१.२०२५, २०.०२.२०२५, २४.०२.२०२५, १०.०३.२०२५, १७.०३.२०२५, २४.०३.२०२५, २८.०३.२०२५, २१.०४.२०२, ०५.०५.२०२५, १९.०५.२०२५, ०९.०६.२०२५, २७.०६.२०२५, १७.०७.२०२५, ०६.०८.२०२५, १९.०८.२०२५, ०७.१०.२०२५, ३०.१०.२०२५, ०७.११.२०२५, १९.११.२०२५, १२.१२.२०२५, २३.१२.२०२५, ३०.१२.२०२५, ०७.०१.२०२६, २०.०१.२०२६, ०६.०२.२०२६, १६.०२.२०२६, २०.०२.२०२६, २४.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आल्यात.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांचे तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार अर्जदार मौजे अकोला येथील रहिवाशी अ गैरअर्जदार क्र. ०१ यांचे सोबत घनिष्ठ संबंध होते. गैरअर्जदार क्र. ०१ हे सावकारीचा धंदा करतात. अर्जदार यांना आर्थिक अडचणीमुळे तसेच व्यापार करण्याकरिता कर्जाऊ रक्कमेची आवश्यकता होती. अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना डेव्हलपमेंटच्या व्यवसायाकरिता कर्जाची आवश्यकता असल्याने रक्कमेची मागणी केली होती. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाऊ रक्कम व्याजाने देण्याचे त्यांचे व्यवसायातील तक्रार अर्जामध्ये नमूद केल्यानुसार अटी व शर्तीवर मान्य केल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

अर्जदार क्र. ०१ यांचेकडे अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांच्या सर्व अटी व शर्ती मान्य केल्या. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाऊ रक्कम देण्यापुर्वी दि. १२.०५.२०१५ रोजी अर्जदार क्र. ०१ यांचे वडील जानकीलाल बन्सीलाल सोमाणी यांचे नावावरील मौजे खडकी बु. येथील शेत सर्वे क्र. ४३/१ प्लॉट क्र. १५ खुला प्लॉट क्षेत्रफळ ६७६९.५४ चौ. फुट इसारचिट्ठीत नमूद चतुसिमेतील स्थावरची भरणा पावती बनवून नोटरी करुन लिहून नोंदवुन घेतला. यामध्ये रु. २५,००,०००/- (अक्षरी पंचविस लाख) मध्ये सौदा झाल्याचे दर्शवुन पुर्ण रक्कम मिळाल्याचे नमूद करण्यात आले. परंतु त्यावेळेस सदर मालमत्तेची बाजारभाव किंमत अंदाजे १.४० कोटी रुपये होती. परंतु प्रत्यक्ष रक्कम देण्याचा कोणताही व्यवहार झाला नाही. अर्जदार क्र. ०१ यांना रक्कमेची आवश्यकता जुन २०१५ नंतर असल्याने व गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत घनिष्ठ संबंध असल्याने अर्जदार क्र. ०१ ने कोणतीही हरकत घेतली नाही. अर्जदार क्र. ०१ यांना त्यांचे व्यवसायाकरीता रु. ४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख रुपये) कर्जाची आवश्यकता होती. अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना दि. ०१.०६.२०५ रोजी कर्जाऊ रक्कमेची मागणी केली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अटी व शर्ती प्रमाणे गहाण तारण म्हणून चेकची व लेटरहेडवर रक्कम मिळाल्याची पोच बनवून देण्याची मागणी केली. त्यानुसार गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०२ यांचे लेटरहेड वर दि. ०१.०६.२०१५ रोजी श्री. विनोदकुमार झवर यांचे नावाने रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये) मे. आदित्य कार्पोरेशन यांचे मार्फत मिळाल्याचे लेटरहेडवर लिहून दिले. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी ०९ लेटरहेडवर प्रत्येकी पाच लाख रुपये मिळाल्याचे लिहून घेतले. तसेच अर्जदार क्र. ०२ यांचे दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला मधील अर्जदार क्र. ०२ यांचे खात्याचे दिनांक नमूद नसलेले १० चेक गैरअर्जदार क्र. ०१ यांचे नावाचे प्रत्येकी रुपये पाच लाख रक्कमेचे चेक सहया करुन घेतले. त्यानंतर गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांना आवश्यकतेनुसार रक्कम देणे सुरु केले. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी दि. ०१.०६.२०१५ रोजी रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये) दिले. त्यानंतर दि. १९.०६.२०१५ रोजी रु. २,००,०००/-, दि. २५.०६.२०१५ रोजी रु. २,००,०००/, दि. ३०.०६.२०१५ रोजी रु. ३,००,०००/-, दि. ०४.०७.२०१५ रोजी रु. १,००,०००/-, दि. १८.०७.२०१५ रोजी रु. १,५०,०००/-, दि. ३०.०७.२०१५ रोजी रु. ५,००,०००/-, दि. १९.०८.२०१५ रोजी रु. ३,५०,०००/-, दि. ०३.०९.२०१५ रोजी रु. २,००,०००/-, दि. १५.०९.२०१५ रोजी रु. ५०,०००/-, दि. २९.०९.२०१५ रोजी रु. ३,००,०००/-, दि. ०१.१०.२०१५ रोजी रु. ३०,०००/-, दि. १०.१०.२०१५ रोजी रु. ५०,०००/-, दि. १०.११.२०१५ रोजी रु. ५०,०००/-, दि. २८.११.२०१५ रोजी रु. २०,०००/, दि. ३०.११.२०१५ रोजी रु. १,५०,०००/-, दि. ०१.१२.२०१५ रोजी रु. ३,००,०००/-, दि. ३०.१२.२०१५ रोजी रु. ३०,०००/-, दि. ०५.०१.२०१६ रोजी रु. ५,००,०००/- आणि दि. ०७.०१.२०१६ रोजी रु. ४,४७,६०८/- अशी एकुण रक्कम रु. ३७,७७,६०८/- (अक्षरी रुपये सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) गैरअर्जदार क्र. १ यांनी कर्जाचे स्वरुपात द. सा. द. शे. १८ टक्के व्याजदराने अर्जदार क्र. ०१ यांना दिली होती.

अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांचे मधील व्यवहार सुरळीत सुरु होते. घनिष्ठ संबंध असल्यामुळे व्याजाची रक्कम एकाच वेळी देण्याचे ठरले होते. अर्जदार क्र. ०१ चे वडीलांनी ज्या मालमत्तेचा इसार केला तो प्लॉट क्र. १५ दि. २९.०५.२०१७ रोजी दस्त क्र. १६१८ नुसार विक्री केला. या आलेल्या रक्कमेतुन दि. १६.०६.२०१७ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ यांना रु. २५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचविस लाख) नगदी देवून हिशोबामध्ये जमा केले. अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. १ यांचे मधील व्यवहार सुरळीत सुरु होते. नोटबंदी मुळे व आर्थीक मंदीमुळे अर्जदार क्र. ०१ हे गैरअर्जदार क्र. ०१ यांना पुढील व्याज व राहिलेली रक्कम परत देवु शकले नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ०१ यांनी जाने २०२० पासुन रक्कमेकरिता वारंवार मागणी सुरु केली. तसेच कर्जाची दिलेली रक्कम गैरअर्जदार क्र. ०१ यांची एकटयाची नसुन अन्य व्यक्तींची आहे त्यामुळे ते गैरअर्जदार क्र. ०१ यांना रक्कमेची मागणी करित आहेत असे सांगीतले. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ अवाजवी रक्कमेची मागणी करित आहे, असे दिसल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांनी हिशोबाची मागणी केली. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी रक्कम जमा करते वेळी हिशोब करुन घेवु अशी हमी दिली. गैरअर्जदार क्र ०१ यांनी कर्जाची रक्कम व्याजासह देणे शक्य नसल्यास अर्जदार क्र. ०१ च्या इतर स्थावर मालमत्तेचे गहाणतारण व प्रतिभुती म्हणून खरेदीखत करुन देण्याची मागणी केली. खरेदीखत करुन न दिल्यास

गैरअर्जदार क्र. ०
करुन वसुल

गैरअर्जदार क्र. ०१ यांच्याकडे असलेले अर्जदार क्र. ०२ चे दहा चेक वसुली करिता लावुन रक्कम कोर्टामार्फत केस दाखल करुन वसुल करण्याची धमकी दिली.

गैरअर्जदार क्र. ०१ यांचे वारंवार रक्कमेची मागणी वाढल्यामुळे व चेकच्या आधारे कोर्टाद्वारे वसुली करण्याची धमकी दिल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना कर्ज व व्याजाचे मोबदल्यात त्यांचेकडे असलेल्या प्लॉट पैकी काही प्लॉटची खरेदी गहाण तारण व प्रतिभुती म्हणून करुन घेण्याची विनंती केली. त्यानुसार गैरअर्जदार क्र. ०१ यांने अर्जदारांचे कुटूंबाचे मालकीचा मौजे खडकी बु. येथील शेत सर्वे क्र. ४३/१ मधील प्लॉट क्र. ७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करुन देण्याची मागणी केली. तसेच सदर प्लॉटचा भाव रु. २२००/-(अक्षरी दोन हजार दोनशे रुपये) प्रति फुट होता. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांना व्यवसायाकरिता अधिकची रक्कम व्याजाने देण्यात येईल अशी हमी दिली. तसेच सदरची रक्कम प्लॉट ची शासकियदराने होणारी किंमत दर्शवुन कर्ज म्हणून चेकने देण्यात येईल तसेच त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अशी हमी दिली की, कर्जाची व व्याजाची होणारी रक्कम परत दिल्यास सदर प्लॉटची खरेदी पलटवुन देण्यात येईल तसेच रक्कम न दिल्यास कर्जाचे व व्याजाचे हिशोब करुन हिशोबानंतर होणारी रक्कम प्लॉटच्या किंमतीतुन रु. २,२५,५६,६००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचविस लाख छप्पन हजार सहाशे) मधुन वजा करुन राहिलेली उर्वरित रक्कम गैरअर्जदार क्र. ०१ हे अर्जदारांना परत करतील गैरअर्जदार क्र. ०१ यांनी असे आश्वासन दिले परंतु अर्जदार क्र. ०१ यांचे कडील रक्कमेचा व्याजासह हिशोब केला नाही. तसेच जमा केलेली रक्कम रु. २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख) जमा केल्यानंतर किती रक्कम शिल्लक राहिली होती हे सांगीतले नाही.

अर्जदार क्र. ०१ यांचे गैरअर्जदार क्र. ०१ यांचे सोबत मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांनी प्लॉटचे नाममात्र खरेदीखत करुन देण्यास होकार दिला. परंतु गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाच्या रक्कमे पैकी बरिच रक्कम ही गैरअर्जदार क्र. ०२ यांचे परिवाराची असल्याने त्याचे नावाने खरेदीखत लिहून नोंदवुन देण्याची मागणी केली. तसेच व्यवहारीक सोईचे दृष्टीने अर्ध्याजागेचे दोन खरेदीखत लिहून नोंदवुन देण्याची मागणी केली. आपसात ठरल्याप्रमाणे अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांचे सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. ०२ यांचे नावाने मौजे खडकी बु. ता. जि. अकोला येथील शेत सर्वे क्र. ४३/१ मधील प्लॉट क्र. ७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मि. पैकी ४८२.०६ चौ. मि. प्लॉटचे नाममात्र खरेदीखत लिहून नोंदवुन दिले ज्याचा दस्त क्र. ३७७८/२०२०, असुन दि. ०५.११.२०२० आहे. या खरेदीमध्ये शासकीय दराने होणारी प्लॉट ची किंमत रु. ३४,३०,०००/- (अक्षरी चौतीस लाख तिस हजार रुपये) एच. डी. एफ. सी. बँक लि, शाखा सेठी हाईट्स समोर, अकोलाचा चेक क्र. ००००५६ दि. ०५.११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले. त्याच दिवशी त्याच प्लॉट क्र. ७ मधील जागेतील उर्वरित क्षेत्र ४७०.८८ चौ. मि. जागेचे दुसरे नाममात्र खरेदीखत लिहून घेण्यात आले. परंतु तांत्रिक अडचणीमुळे याची नोंदणी होऊ शकली नाही. सदरचा दस्त दि. ०७.०१.२०२१ रोजी नोंदविल्या गेला असुन ज्याचा दस्त क्र. २१९/२०२१ हा आहे. या खरेदीमध्ये शासकीयदराने होणारी प्लॉट ची किंमत रु. ३३,५०,०००/- (अक्षरी तेहत्तीस लाख पन्नास हजार रुपये) एच. डी. एफ. सी. बँक लि, शाखा सेठी हाईट्स समोर, अकोलाचा चेक क्र. ००००५५ दि. ०५.११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले. याच दिवशी गैरअर्जदार क्र. ०२ यांची आजी नामे सौ. लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचे नावावरिल भाडेकरु असलेला फ्लॅट घ्यावाच लागेल अशी बळजबरी करुन गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी फ्लॅटचे खरेदीखत अर्जदार क्र. ०१ यांचे नावाने लिहून नोंदवुन दिले. ज्याचा दस्त क्र. ३७६३/२०२०, असुन दि. ०५.११.२०२० आहे. या फ्लॅटची किंमत रु. १६,००,०००/- (अक्षरी सोळा लाख रुपये) अर्जदार क्र. ०१ यांनी दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि, अकोला शाखा अकोला यांचे चेक क्र. ६६३९८८ नुसार दिली. यानंतर गैरअर्जदार क्र. ०१ यांना अर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाच्या रक्कमेचा व्याजासह हिशोब करुन देण्याची मागणी केली. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी सुरुवातीला नंतर हिशोब करुन देतो असे सांगीतले. वारंवार विनंती करुनही हिशोब न केल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांनी नातेवाईक व मित्र परिवार यांना घेवुन जावुन हिशोब मागीतला त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांचे कर्ज खात्याचा हिशोब संगणकात दि. ०१.११.२०१९ पर्यंतचा असलेला प्रिंट काढुन दिला व पुढील हिशोब गैरअर्जदार क्र. ०१ यांचे कर्मचारी अमित काटकोरीया यांनी दि. ०१.११.२०२० पर्यंत हाताने लिहून दिला. गैरअर्जदार क्र. ०१ यांचे अतिशय विश्वसनीय असल्यामुळे अमित काटकोरीया यांनी इसारचिठ्ठीवर सुध्दा साक्षीदार म्हणून सही केली होती. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी त्यांचे संगणकात ठेवलेल्या नोंदीप्रमाणे अर्जदार क्र. ०१ यांचेकडे दि. १६.०६.२०१७ रोजी व्याजासह रु. ५९,५४,८१०/- (अक्षरी एकोणसाठ लाख चौपन्न हजार आठशे दहा रुपये) बाकी होते त्यामध्ये जमा केलेले रु. २५,००,०००/- वजा करुन अर्जदार क्र. ०१ यांचेकडे रु. ३४,५४,८१०/- (अक्षरी चौतीस लाख चौपन्न हजार आठशे दहा) बाकी राहील्याचे दर्शविण्यात आले होते. त्यानंतर दि. ०१.०७.२०१७ पासुन प्रत्येक महिण्याला व्याज आकारणी करुन ती मुद्दलामध्ये मिळविण्यात येऊन त्यावर पुन्हा

व्याजाची आकारणी करण्यात आलेली होती. दि. ०१.११.२०२० पर्यंत चक्र.वाढ व्याज पध्दतीने अर्जदार क्र. ०१ यांच्याकडे रक्कम रु. ८९,७७,१५०/- बाकी असल्याचे हिशोबामध्ये नमूद करण्यात आले होते. अर्जदार क्र. ०१ यांनी जमा केलेली रक्कम रु. २५,००,०००/- मिळुन गैरअर्जदार क्र. ०१ यांचा हिशोब रु. १,१४,७७,१५०/- झाला होता. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी मुद्दल रक्कम रु. ३७,७७,६०८/- वर मासिक २.७५ टक्केदराने चक्र.वाढ व्याज आकारुण एकुण व्याज रु. ७६,९९,५४२/- (अक्षरी शहाहत्तर लाख नव्यांन्युव हजार पाचशे बेचाळीस) आकारले होते. आपसात ठरल्याप्रमाणे अर्जदार क्र. ०१ यांचे सोबत गैरअर्जदार क्र. ०१ यांनी केलेल्या करारानुसार रु. ३७,७७,६०८/- (अक्षरी सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) कर्जाचे रक्कमेवर द. सा. द. शे. १८ टक्के व्याज दराने एका वर्षाचे व्याज रु. ६,७९,९६८/- (अक्षरी सहा लाख एकोनएन्सी हजार नऊशे अडुसष्ठ) रुपये होत होते. तसेच साडेपाच वर्षाचे व्याज रु. ३७,३९,८२८/- (अक्षरी सदोतीस लाख एकोणचाळीस हजार आठशे अठ्ठावीस रुपये) होत होते. मुद्दल मिळुण एकुण रक्कम रु. ७५,१७,४३६/- (अक्षरी पंचाहत्तर लाख सतरा हजार चारशे छत्तीस रुपये) होत होती. त्यामधुन अर्जदार क्र. ०१ यांनी जमा केलेले रु. २५,००,०००/- (अक्षरी पंचवीस लाख रुपये) वजा करुन अर्जदार क्र. ०१ यांचेकडे व्याजासह एकुण रक्कम रु. ५०,१७,४३६/- (अक्षरी पंन्नास लाख सतरा हजार चारशे छत्तीस रुपये) बाकी राहत होती. अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना कर्जावरिल व्याजाचा दर द. सा. द. शे. १८ टक्के ठरला होता असे म्हटले असता, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी आम्ही मासीक ३ टक्के व्याजदराने रक्कम देतो व तोच दर ठरला होता असे म्हटले. त्यापेक्षा कमी व्याजदर आम्हाला परवडत नाही असे सांगीतले. जास्तीचे दराने व्याज आकारणी झाल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांना दुप्पट व्याजाची रक्कम आकारल्या गेली त्यामुळे वाद निर्माण झाला. त्यावेळी अर्जदाराचे कुटूंबातील सदस्यांनी पुढील काळात पुन्हा फसवणुक होऊ नये व वाद वाढु नये म्हणून व्यवहार त्याच दिवशी संपुष्टात आणण्याचे ठरविले. त्यावेळी मध्यस्था समोर तडजोड होऊन व्याजात काही सुट देण्याचे ठरले. तसेच गैरअर्जदार क्र. ०१ यांचे व्याजासह रु. ६५,००,०००/- (अक्षरी पाशष्ठ लाख रुपये) देण्याचे ठरले तसेच खरेदीमध्ये चेक ने दिलेली रक्कम रु. ६७,८०,०००/- (अक्षरी सदुशष्ट लाख एन्सी हजार रुपये) ही रक्कम मिळवुन एकुण १,३२,८०,०००/-(अक्षरी एक कोटी बत्तीस लाख एन्सी हजार रुपये) ही रक्कम प्लॉट ची किंमत रु. २,२५,५६,६००/-(अक्षरी दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे रुपये) मधुन वजा करुन राहिलेली रक्कम रु. ९२,७६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांना एका महिण्यात देण्याचे कबुल केले.

अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना दि. ०७.०२.२०२१ रोजी राहिलेली रक्कम रु. ९२,७६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) ची मागणी सुरु केली. परंतु गैरअर्जदार क्र. ०१ यांने कर्जाचा हिशोब व्याजासह बरोबर झाला. आता आमच्याकडे कोणतीही रक्कम राहिलेली नाही. तुमचे कागदपत्र लेटरपॅड, सह्या केलेले कोरे चेक व वडीलांची इसारचिठ्ठी परत दिलेले आहेत. प्लॉट तुम्ही खरेदी करुन दिलेला आहे. त्यामुळे व्यवहार पुर्ण झाला कोणतीही रक्कम मिळणार नाही तुम्हाला जे करावयाचे असेल ते करा या नंतर रक्कमेची मागणी करावयाची नाही तसेच फोन सुद्धा करावयाचा नाही असे स्पष्ट सांगीतले. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांची अवैध सावकारी व्यवहारातुन फसवणुक व विश्वासघात करुन रुपये सव्वा दोन कोटी किंमतीची मालमत्ता फक्त रु. ६७,८०,०००/- (अक्षरी सदुसष्ठ लाख एन्सी हजार रुपये) मुद्दल रक्कम व त्यावरिल व्याजात हडप केली. त्यामुळे अर्जदारांना सदरची तक्रार दाखल करण्या शिवाय अन्य पर्याय राहीला नाही.

तक्रार दाखल करण्यास कारण गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार याचेकडुन कर्जास गहाणतारण व प्रतिभुती म्हणून सन २०१५ मध्ये प्लॉटची नाममात्र भरणा पावती लिहून नोंदवुन घेतले व लेटरहेडवर कर्ज मिळाल्याचे लिहून घेतले तसेच चेक गहाणतारण घेवुन कर्ज दिले तेव्हा तसेच सन २०२० मध्ये नाममात्र खरेदीखत लिहून नोंदवुन दिले तेव्हा तसेच कर्जाची रक्कम व्याजासह परत केल्यानंतरही प्लॉटमधील उर्वरित रक्कम परत केली नाही. तेव्हापासुन निरंतर वि. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात निरंतर घडले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांचे कोर्टा बाहेर आपसात कोणतीही तडजोड झालेली नाही. तरी अर्जदारांच्या तक्रारीवर चौकशी करुन योग्य ती कायदेशिर कार्यवाही करावी. तसेच गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी अर्जदार क्र. ०१ यांचेकडून कर्जाऊ रक्कमेस गहाणतारण व सुरक्षितता म्हणून घेतलेले दि. १२.०५.२०१५ रोजीची नाममात्र भरणा पावती ज्याचा स्टॅम्प क्र. एल. जी. ७७१९१८ तसेच गैरअर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांचे नावाने अर्जदाराकडुन कर्जास गहाणतारण व प्रतिभुती म्हणून लिहून नोंदवुन घेतलेले नाममात्र खरेदीखताचे दस्त क्र. ३७७८/२०२० दि. ०५.११.२०२० व दस्त क्र. २१९/२०२१ दि. ०७.०१.२०२१ हे दोन्ही दस्त अवैध घोषित करुन रद्द करण्यात यावे. तसेच महसुल नोंदी अर्जदारांचे नावाने करण्याचे निर्देश देण्यात यावे अशी विनंती केली.

**अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १८(१) व नियम १७(१२) नुसार तात्पुरता मनाई हुकूम मिळणेबाबत अर्ज दाखल केला त्यातील मजकूर खालीलप्रमाणे :-**

आम्ही अर्जदार वरिल पत्त्यावरिल रहीवाशी आहोत. आम्ही गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेविरुध्द अवैध सावकारी धंद्यातून अल्प कर्जाऊ रक्कमेत व व्याजात अमुल्य किंमती मालमत्ता कागदोपत्री हडप केलेली असल्यामुळे सावकारी व्यवहाराची चौकशी करुन कर्जास गहाणतारण व प्रतिभुती म्हणून नोंदणीकृत खरेदीखताद्वारे नाममात्र लिहून नोंदवुन घेतलेले खरेदीचे दस्त अवैध घोषित करुन रद्द करण्याकरिता तक्रार दाखल केली आहे.

सदर व्यवहातील मालमत्तेचे दस्त दि. ०५.११.२०२० व दि. ०७.०१.२०२१ रोजी नोंदवीण्यात आले होते. परंतु गैरअर्जदार क्र. १ व ०२ यांनी करारानुसार तात्काळ पुर्तता न केल्याने व कर्जाचा हिशोब व्याजासह न दिल्यामुळे अर्जदार क्र. ०१ यांना गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ हे फसवणुक करतील अशी शंका आली होती. त्यामुळे अर्जदाराने नाममात्र खरेदी दिलेल्या प्लॉटच्या महसुल नोंदी घेण्यात येवू नये अशी हरकत दाखल केली होती. तसेच प्लॉटचा ताबा गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना दिला नव्हता.

सदर प्रकरणातील नाममात्र खरेदी दिलेले दोन्ही प्लॉट अर्जदाराचे ताब्यात असुन महसुल नोंदी अर्जदार क्र. ०१ यांचे नावाने आहेत. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेविरुध्द अवैध सावकारी व्यवहाराबाबत तक्रार दाखल केल्याने गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ श्रीमंत व सक्षम असल्याने बळाचा वापर करुन प्लॉट चा ताबा घेवु शकतात. तसेच दबाव आणुन महसुल नोंदी करुन घेवुन सदरचा प्लॉट विक्री करु शकतात. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी पुर्ण होऊन प्रकरणाचा अंतीम निर्णय होईपर्यंत गैरअर्जदार न. ०१ व ०२ यांनी अर्जदाराचे ताब्यास अडथळा करु नये व मालमत्तेमध्ये कोणत्याही स्वरुपात त्रयस्थ व्यक्तिचा हक्क व अधिकार निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश मिळणे न्यायाच्यादृष्टीने आवश्यक आहे.

न्यायाच्यादृष्टीने तक्रार अर्जाची चौकशी होईपर्यंत अर्जदाराचे ताब्यास संरक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच गैरअर्जदार यांना शेतीचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे तरतुदींनुसार तसेच महाराष्ट्र सावकारी नियम २०१४ चे नियम १७(१२) नुसार वि. पिठासीन अधिकारी यांना असे अधिकार देण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा तसेच गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी स्वत: व त्यांचे हस्तकाद्वारे अर्जदाराचे ताब्यास अडथळा करु नये आणि चौकशी पुर्ण होई पर्यंत मौजे खडकी बु. ता. जि. अकोला सर्वे ४३/१ मधील प्लॉट क्र. ७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर मध्ये कोणत्याही प्रकारे विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र व इतर मार्गाने त्रयस्त पक्षाचा अधिकार निर्माण करु नये असा अंतरीम आदेश न्यायाच्यादृष्टीने देण्यात यावा असे नमूद केले आहे.

**गैरअर्जदार यांचे विधिज्ञ यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १७, १८(१) तसेच नियम १७(१२) नुसार तात्पुरत्या मनाई हूकूम मिळणेबाबतच्या अर्जाला आणि अवैध व्यवहाराची चौकशी करुन कायदेशिर कार्यवाही करण्याबाबतच्या अर्जाला गैरअर्जदारांचा संयुक्तपणे लेखी जबाब दाखल केला तो खालीलप्रमाणे :-**

१) अर्जदार यांनी दाखल केलेले तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज व गैरअर्जदारांला अवैध सावकारी व्यवहाराची चौकशी करुन कायदेशिर कार्यवाही करणेबाबत अर्ज दाखल केले आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ त्यांचा लेखी जबाब संयुक्तपणे याव्दारे सादर करित आहेत. अर्जदार यांनी त्यांचे दोन्ही अर्जामध्ये चुकीची, बिनबुडाची, निरर्थक व खोटे दस्तऐवज बनवून माहिती नमूद केली आहे. सदरच्या माहितीत कुठल्याही प्रकारची सत्यता नसून कायदेशिर आधार नाही.

२) अर्जदार यांनी केलेल्या मनाई हुकुमाच्या अर्जानुसार गैरअर्जदार हे नमूद ठिकाणी राहतात. परंतु गैरअर्जदार क्र. ०१ हे सावकारी व्यवसायकरित नसून हुंडीचिठ्ठीचा व्यवसाय करतात. हे म्हणणे खोटे आहे की, गैरअर्जदार यांनी अवैध सावकारी धंदयातून अल्प कर्ज व रकमेत व व्याजा मालमत्ता कागदोपत्री हडप केलेली आहे. हे म्हणणे खोटे आहे की, गैरअर्जदार यांनी नोंदणीकृत खरेदीव्दारे नाममात्र दस्त नोंदवून खरेदी करुन घेतलेले दस्त अवैध घोषित करुन तक्रार दाखल केली. हे म्हणणे चुकीचे व खोटे आहे की, गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी करारानुसार तात्काळ पुर्तता न केल्याने व कर्जाचा हिशोब व्याजासह न दिल्यामुळे अर्जदार नंबर ०१ यांचा गैरअर्जदार नंबर ०१ व ०२ हे फसवणूक करतील अशी शंका निर्माण झाली होती. हे म्हणणे चुकीचे आहे की, प्लॉटचा ताबा गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना दिला नव्हता. खरेदी झाल्यानंतर प्लॉटचा ताबा हा गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना अर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी ताबडतोब दिला होता.

३)	हे म्हणणे खोटे आहे की, सदर प्रकरणातील नाममात्र खरेदी दिलेले दोन्ही प्लॉट अर्जदाराचे ताब्यात असून महसुल अर्जदार क्र. ०१ यांचे नावे आहेत. अर्जदार यांनी मनाई हुकुमाच्या अर्जामधील परिच्छेद क्र. ०३ मधील संपूर्ण मजकुर खोटा नमूद केला आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना तो मान्य नसून नाकारण्यात येत आहे. गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचे ताब्यामध्ये अर्जदार यांनी खरेदी करुन दिलेल्या संपत्ती आहेत. खरेदी झाल्याबरोबर गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी सदर मालमत्तेचा ताबा घेतला होता. तसेच अर्जातील परिच्छेद क्र. ०४ मधील मजकुर सुध्दा खोटा असल्याने अमान्य करण्यात येत आहे. सदर अर्जामधील प्रार्थना, प्रतिज्ञालेख आणि सत्यापनामधील मजकुर सुध्दा नामंजुर करण्यात येत आहे.

४)	अर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी दाखल केलेला कलम १८(१) व १७ नुसार अवैध सावकारी व्यवहाराची चौकशी करुन कायदेशिर कार्यवाही करणेबाबतच्या अर्जाला सविस्तरपणे जबाब दाखल करण्यात येते की तो येणेप्रमाणे :-

हे म्हणणे चुकीचे व खोटे आहे की, अर्जदार यांना आर्थीक अडचणीमुळे व्यापाराकरिता कर्ज व रक्कमेची आवश्यकता होती तसेच अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांचेकडे व्यवसायाकरिता कर्जाची आवश्यकता असल्याने रक्कमेची मागणी केली होती त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाऊ रक्कम व्याजाने देण्याची त्यांचे व्यवसायातील अटी व शर्तीवर मान्य केले होते. तक्रार अर्जामधील नमूद अ ते ऊ पर्यंतच्या अटी ह्या खोट्या असल्यामुळे अमान्य करण्यात येत आहेत. गैरअर्जदार यांनी अशा प्रकारच्या कोणत्याही अटी अर्जदार यांना सांगीतल्या नाहीत तसेच अर्जदार यांना अर्जामधील नमूद कर्ज रकमांचा कधीही व्यवहार केला नाही.

५)	हे म्हणणे चुकीचे व खोटे आहे की, अर्जदार क्र. ०१ यांचेकडे कोणताही पर्याय नसल्याने गैरअर्जदार क्र. ०१ यांच्या सर्व अटी व शर्ती मान्य केल्या. हे म्हणणे खोटे असल्यामुळे अमान्य करण्यात येते की, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाऊ रक्कम देण्यापूर्वी दि. १२.३०५.२०१५ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ यांचे वडील जानकीलाल सोमाणी यांचे नावावरिल खडकी बु. येथील शेत सर्व्हे नंबर ४३/१ प्लॉट नंबर १५ खुला प्लॉट नोटरी करुन लिहून नोंदवून घेतला. सदर अर्जामधील परिच्छेद क्र. ०२ मधील मजकुर हा खोटा असल्यामुळे अमान्य करण्यात येत आहे. हे म्हणणे खोटे आहे की, अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना दि. ०१.०६.२०१५ रोजी कर्जाऊ रक्कमेची मागणी केली त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अटी व शर्तीप्रमाणे गहाण तारण म्हणून चेकची व लेटरहेडवर रक्कम मिळाल्याची पोच बनवून देण्याची मागणी केली. त्यानुसार गैरअर्जदार क्र. ०१ यांनी दि. ०१.०६.२०१५ रोजी श्री. विनोद झवर यांचे नावाने रु. ५,००,०००/- मिळाल्याचे लेटर हेडवर लिहून दिले. सदर परिच्छेदामध्ये नमूद असलेल्या नऊ लेटरहेडवर व नऊ चेकवर नमूद केलेला मजकुर हा बनावट व खोटे दस्ताऐवज आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना फसविण्याकरिता खोटे दस्ताऐवज अर्जदार यांनी बनविले आहेत. त्यामुळे त्यांचेवर भारतीय दंड संहितेनुसार तसेच इतर कायदयान्वये त्यांचेवर गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे. कारण त्यांनी खोटे दस्तऐवज बनवून त्याचा गैरवापर करुन आपल्या समोर सादर केले आहेत. वास्तविक पाहता सदर दस्तऐवजावर कुठेही गैरअर्जदार यांची सही नाही तसेच रक्कम मिळाल्याची वगैरे सुध्दा सही सदर दस्तएवजावर नाही त्यामुळे अर्जदार यांनी स्वत:च्या सहीनिशी खोटे दस्तऐवज बनवून गैरअर्जदार यांना फसविण्याचे प्रयत्न करित आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ हे अर्जदार यांना एवढ्या मोठ्य रक्कमा रोख स्वरुपामध्ये देऊ शकत नाहीत याची जाण गैरअर्जदार यांना आहे. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जामध्ये नमूद दिनांकांना सदरच्या रक्कमा कधीही दिल्या नाहीत.

६)	तक्रारीमधील परिच्छेद क्र. ०३ मधील मालमत्ता ही अर्जदार क्र. ०१ चे वडील यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांना इसार करुन दाखवलेला प्लॉट दुसऱ्याला विकला तो कुणाला विकला हे गैरअर्जदार क्र. ०१ ला माहिती नाही. दि. २९.०५.२०१७ रोजी दस्त क्र. १६१८ नुसार विक्री केली आहे. सदरच्या व्यवहारामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार तथा सावकारी व्यवहार नाही. सदर परिच्छेदामधील इतर मजकुर हा चुकीचा असल्यामुळे तो अमान्य करण्यात येत आहे.

७)	परिच्छेद क्र. ०४ मधील नमूद व्यवहार हा नियमानुसार झालेला आहे. सदर अर्जामध्ये कर्जाचा व व्याजाचा जो उल्लेख केलेला आहे तो चुकीचा आहे तसेच प्लॉटची खरेदी पलटवून देण्यात येईल बाबतची विधाने ही खोटी आहेत. उर्वरित मजकुर हा सुध्दा अमान्य करण्यात येत आहे

८)	तक्रार अर्जामधील परिच्छेद क्र. ०५ मध्ये ज्या बाबी नमूद आहेत त्या अर्जदार यांनी खोट्या नमूद केल्या आहेत. हे म्हणणे खोटे आहे की, आपसात ठरल्याप्रमाणे अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ यांचे सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. ०२ यांच्या नावाने नमूद वर्णनाची मालमत्ता प्लॉट क्र. ०७ ही नाममात्र खरेदीखत लिहून नोंदवून दिले त्याचा दस्त क्र. ३७७८/२०२०

आहे. गैरअर्जदार क्र. ०२ यांनी शासकिय नियमाप्रमाणे स्टॅम्प ड्युटी भरुन सदर प्लॉटची खरेदी केली आहे. परंतु अर्जदार यांनी तक्रार अर्जामध्ये खोट्या रक्कमा व खोट्या बाबी नमूद करुन गैरअर्जदार यांना फसविण्याचा प्रयत्न करित आहेत. सदर परिच्छेदामधील इतर बाबी ह्या अनावश्यक व निबंध स्वरुपाच्या असल्यामुळे त्या अमान्य करण्यात येत आहेत. हे म्हणणे खोटे आहे की, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांना एका महिन्यामध्ये उर्वरित रक्कम देतो असे कबुल केले.

९) परिच्छेद क्र. ०६ मधील नमूद दि. ०७.०२.२०२१ रोजी राहिलेली रक्कम ची मागणी सुरु केली हे म्हणणे खोटे आहे. सदर परिच्छेदामधील व्याजाची रक्कम सह्या केलेले कोरे चेक तसेच इतर बाबी खोट्या असल्यामुळे नामंजुर करण्यात येत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सावकारी व्यवहार तसेच व्याजाचे व्यवहार कधीही झालेले नाहीत.

१०) हे म्हणणे खोटे आहे की, तक्रार दाखल करण्यास कारण गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार यांच्याकडून कर्जास गहाण, तारण व प्रतिभुती म्हणून सन २०१५ मध्ये प्लॉटची नाममात्र भरणा पावती लिहून नोंदवून घेतले व लेटर हेडवर कर्ज मिळाल्याचे सुध्दा लिहून घेतले तसेच चेक गहाण तारण घेऊंन कर्ज दिले. वास्तविक पाहता सदर तक्रार अर्जास कोणत्याही प्रकारचे तक्रार दाखल करण्यास कारण घडले नाही. तरी सुध्दा अर्जदार यांनी गैरअर्जदार विरुध्द सदरची खोटी तक्रार दाखल केली आहे.

११) परिच्छेद क्र. ०८ मधील मजकुर सुध्दा खोटा असल्यामुळे अमान्य करण्यात येत आहे. तक्रार अर्जाला दिलेली प्रार्थना खोटी असल्यामुळे अमान्य करण्यात येत आहे. तसेच प्रतिज्ञालेख व सत्यापनामधील मजकुर सुध्दा अमान्य करण्यात येत आहे.

**<u>अधिकचा जबाब</u> :-**

१२) अर्जदार यांनी तक्रारीसोबत सादर केलेले दस्तऐवज प्राप्त झाले असून त्यामधील फक्त खरेदीखत व स्थावरची भरणा पावती वगळता इतर सर्व दस्तऐवज बनावट स्वरुपाचे आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी अर्जदार क्र. ०१ यांचे वडिलांसोबत स्थावरची भरणा पावती दि. १२.०५.२०१५ रोजी नोटरी केली होती. अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांची चांगली मैत्री असल्यामुळे गैरअर्जदार क्र. ०१ यांनी सदरच्या दस्तावर अर्जदार क्र. ०१ यांचे सांगण्यावरुन सही केली होती. कारण अर्जदार क्र. ०१ यांचेवर अनेक ठिकाणचे कर्ज असल्यामुळे त्यांची ती मालमत्ता लिलावात जाऊ नये त्याकरिता सदरची स्थावर भरणा पावती नोटरी केली होती. गैरअर्जदार क्र. ०१ यांचा जर सदर मालमत्तेवर डोळा असता तर त्यांनी सदरची मालमत्ता हस्तगत केली असती परंतु त्यांनी तसे केले नाही. यावरुन हे स्पष्ट होते की, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी केलेल्या मदतीची परतफेड त्यांचेवरच उलटली आहे.

१३) सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी यांनी सह्या केलेले चेक व त्यांचे लेटर हेडवर खोटा मजकुर असलेल्या पावत्या लिहिल्या आहेत. त्याचा त्यांनी गैरअर्जदाराविरुध्द गैरवापर केलेला आहे. सदरच्या पावत्यांवर गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ ची कुठेही सही नाही. त्यामुळे सदरचे दस्तऐवज व चेक हे गैरअर्जदार यांना फसविण्यासाठी बनविलेले आहेत हे स्पष्ट होते. अशा प्रकारचे खोटे दस्तऐवज बनवून समाजामध्ये गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांची अर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी बदनामी केली आहे. गैरअर्जदार क्र. ०१ हे कोणत्याही प्रकारचा सावकारी व्यवहार करित नाहीत. तरी सुध्दा तक्रार अर्जामध्ये खोटी माहिती नमूद केली.

१४) अर्जदार यांनी तक्रारीसोबत दस्त क्र. ०७ नमूद केला आहे. तसेच तो दस्त अभिलेखावर सादर केला आहे. सदरचे स्टेटमेंट हे खोटे असून बनावट असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. सदरच्या स्टेटमेंटला कोणत्याही प्रकारचा कायदेशिर आधार नाही. तसेच त्यावर कोणाचीही सही नाही. त्यामुळे तो दस्तएवज भारतीय पुरावा कायद्यानुसार विचारात घेता येऊ शकत नाही.

१५) अर्जदार क्र. ०१ यांनी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेविरुध्द तलाठी मौजे खडकी बु. यांचेकडे नाव नोंद न होण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. वास्तविक पाहता गैरअर्जदार यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेवर अर्जदार यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क नाही. शासकीय नियमानुसार सदरचे व्यवहार झालेले असून, त्याची खरेदी झालेली आहे आणि गैरअर्जदार यांनी सदर मालमत्तेचा ताबा सुध्दा घेतलेला आहे. गैरअर्जदार यांना मानसिक त्रास देण्याकरीता सदरची तक्रार अर्जदार यांनी दाखल केलेली असल्यामुळे खारिज करण्यात यावी. तसेच सदर व्यवहारामध्ये कुठलाही प्रकारचा सावकरी व्यवहार नसल्याने सुध्दा सदरची तक्रार ही खारिज करण्यात यावी असे नमूद केले.

**अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी मुळ अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला तो खालीलप्रमाणे :-**

१. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेविरुद्ध अवैध सावकारी व्यवहाराबाबत तक्रार दाखल केली होती. सदरची तक्रार दाखल केल्यानंतर श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) (गैरअर्जदार क्र. ३) यांनी वारंवार अर्जदारांवर दडपण निर्माण करण्याकरिता फोन करुन दबाब आणणे सुरु केले. तसेच रक्कमेतील तफावत व व्याजाबाबत सुद्धा वाद निर्माण केले. श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) यांनी अर्जदारांना अप्रत्यक्ष पणे धमकी देणे सुरु केल्यामुळे अर्जदार व त्यांचा मुलगा यांनी सदरच्या संवादाची मोबाईल मध्ये रेकॉर्डीग केली आहे. या रेकॉर्डीग वरुन सदरचा व्यवहार हा सावकारीचा असल्याचे सिद्ध होते. तसेच श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) हे गैरअर्जदार क्र. ०२ यांचे कुटूंबाचे प्रमुख असल्याने व पैश्याचे व्यवहार हे स्वत: करित असल्याने सदर प्रकरणात गैरअर्जदार क्र. ०३ म्हणून समाविष्ठ करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच अर्जातील परिच्छेद क्र. ५ नंतर परिच्छेद क्र. ५(अ) पुढिलप्रमाणे समाविष्ठ करणे सुद्धा न्यायाच्यादृष्टीने आवश्यक आहे.

गैरअर्जदार क्र. ०३ श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) वय ६० वर्ष, धंदा व्यापार व फायनान्स, रा. कामा प्लॉट, स्टेशन रोड अकोला, ता. जि. अकोला

परिच्छेद क्र. ५(अ) गैरअर्जदार क्र. ०३ हे व्यवसायाचे प्रमुख असुन त्यांनी गैरअर्जदार क्र. ०२ यांचे नावाने सदरचे व्यवहारातील दस्त नोंदवुन घेतले आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाच्या रक्कमेस गहाणतारण व प्रतिभुती म्हणून दस्त गैरअर्जदार क्र. ०२ यांचे नावाने नोंदवुन घेतले होते. परंतु गैरअर्जदार क्र. ०३ यांनी फोन वर वारंवार चर्चा करुन जास्त रक्कमेची मागणी केली. या सर्व संवादाची रेकॉर्डीग मोबाईल मध्ये केलेली आहे. तसेच त्याची सि.डी.ची कॉपी प्रकरणात आवश्यकतेनुसार अर्जदार दाखल करण्यास तयार आहेत. गैरअर्जदार क्र. ०३ यांचा व्यवहारात सहभाग असल्याने त्यांना प्रकरणात समाविष्ठ केले आहे. करिता अर्जात दुरुस्ती करण्याची परवानगी दयावी व कृष्णा गणपतलाल साव यांना गैरअर्जदार क्र. ०३ म्हणून समाविष्ठ करुन परिच्छेद ५ नंतर परिच्छेद ०५(अ) दुरुस्ती करुन समाविष्ठ करण्यात यावे अशी विनंती केली.

**गैरअर्जदार यांचे विधिज्ञ यांनी मुळ अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबतचे अर्जास जबाब दाखल केला तो पुढीलप्रमाणे :-**

१) अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेविरुध्द अवैध सावकारी व्यवहारा विरुध्द खोटी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे नाकबुल आहे की, सदरची तक्रार दाखल केल्यानंतर श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) (गैरअर्जदार क्र. ०३) यांनी वारंवार अर्जदारावर दडपण निर्माण करण्याकरीता फोन करुन दबाव आनणे सुरु केले. हे म्हणणे नाकबुल आहे की, तसेच रक्कमेतील तफावत व व्याजाबाबत सुध्दा वाद निर्माण केले. हे म्हणणे ना कबुल आहे की, श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) यांनी अर्जदारांना अप्रत्यक्षपणे धमकी देणे सुरु केल्यामुळे अर्जदार व त्यांचा मुलगा यांनी सदरच्या संवादाची मोबाईलमध्ये रेकॉर्डीग केलेली आहे. वास्तविक पाहता कुणाचीही परवानगी न घेता फोन मध्ये रेकॉर्डीग करणे हा कायदयाने गुन्हा आहे. हे म्हणणे ना कबुल आहे की या रेकॉर्डीगवरुन सदरचा व्यवहार हा सावकारीचा असल्याचे सिध्द होते. हे म्हणणे नाकबुल आहे की, श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) हे गैरअर्जदार क्र. ०२ यांचे कुटुंबाचे प्रमुख असल्याने व पैशाचे व्यवहार हे स्वत: करित असल्याने सदर प्रकरणात गैरअर्जदार क्र. ०३ म्हणून समाविष्ट करणे न्यायाच्या दृष्टिने आवश्यक आहे. परिच्छेद क्र. ०५ नंतर परिच्छेद क्र. ०५(अ) मध्ये पुढीलप्रमाणे समाविष्ट करण्याची प्रार्थना अमान्य आहे. हे म्हणणे नाकबुल आहे की, परिच्छेद क्र. ५अ गैरअर्जदार क्र. ०३ हे व्यवसायाचे प्रमुख असून, त्यांनी गैरअर्जदार क्र. ०२ यांचे नावाने सदरचे व्यवहारातील दस्त नोंदवून घेतले आहेत. हे म्हणणे नाकबुल आहे की, गैरअर्जदार क्र. ०१ यांनी कर्जाच्या रक्कमेस गहाण तारण व प्रतिभुती म्हणून दस्त गैरअर्जदार क्र. ०२ यांचे नावाने नोंदवून घेतले होते. हे म्हणणे नाकबुल आहे की, परंतु गैरअर्जदार क्र. ०३ यांनी फोनवर वारंवार चर्चा करुन जास्त रक्कमेची मागणी केली. हे म्हणणे नाकबुल आहे की, या सर्व संवादाची रेकॉर्डीग मोबाईलमध्ये केलेली आहे. तसेच त्याची सिडी ची कॉपी प्रकरणात आवश्यकतेनुसार अर्जदार दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे नाकबुल आहे की, गैरअर्जदार क्र. ०३ यांचा व्यवहारात सहभाग असल्याने त्यांना प्रकरणात समाविष्ट केलेले आहे. तसेच प्रार्थना नाकबुल आहे.

२) गैरअर्जदार सविनय अधिकचे म्हणणे कथन करतात की, श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) हे गैरअर्जदार क्र. ०२ यांचे वडीलांचे मोठे भाऊ आहेत. अर्जदारांचा श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) यांच्याशी पुर्वीपासून परिचय आहे व त्यांच्या व्यवहाराबद्दल देखील माहिती आहे. अर्जदारांनी अर्जात आरोप करतेवेळी आरोप हे नेमक्या स्वरुपात करणे आवश्यक होते परंतु त्यांनी तसे न करता व कुठलीही काळ वेळ तसेच भ्रमणध्वनी क्र.मांक नमूद न करता अतिशय मोघम स्वरुपामध्ये केलेले आहेत. त्यामुळे अर्जदारांनी कुठल्याही प्रकारचे ठळक आरोप त्यांच्यावर केलेले नाहीत. तसेच अर्जाच्या स्वरुपावरुन असे देखील दिसून येते की, अर्जदार हे कुठल्याही ठोस पुराव्याशिवाय बिनबुडाचे व बेकायदेशिर आरोप करत आहेत व प्रकरण लांबवत आहेत. वास्तविक पाहता अर्जदारांनी आरोप लावतेवेळी सदरच्या घटना कधी घडल्या हे स्पष्ट करणे आवश्यक होते. अर्जदारानी मोघमपणे आरोप करुन श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) यांनी अर्ज दाखल केल्यानंतर दडपण निर्माण करण्याकरिता फोन केले असे नमूद केले आहे. वास्तविक पाहता अर्ज हा दोन वर्षापूर्वी दाखल झालेला आहे. त्यामुळे अर्जदाराचे हे आरोप कालबाह्य असल्याचे स्पष्ट दिसून येते. सदरचे आरोप हे कपोलकल्पीत असून, अर्जदार हे विद्यमान न्यायालयाची दिशाभूल करित आहेत.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयानुसार कुणाच्याही आवाजाचे ध्वनिमुद्रण करणे हे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे अर्जदारांनी विद्यमान न्यायालयासमोर कथन केलेले आहे की, त्यांच्याकडे श्री. कृष्णा गणपतलाल साव (अग्रवाल) यांचे ध्वनिमुद्रण त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये संग्रहीत केलेले आहे. सदरची बाब ही भा.द.वि. नुसार व भारतीय राज्य घटनेनुसार शिक्षेस पात्र आहे. त्यासाठी देखील अर्जदाराचा अर्ज हा बेकायदेशिर धरुन रद्द होण्यास पात्र आहे. अर्जदार हा ठराविक कालावधीनंतर सदरचे आरोप करुन शांत डोक्याने खोटे पुरावे गोळा करित आहे. सदरचा अर्ज हा अर्जदाराने अतिशय विलंबाने दाखल केलेला असून, सदहू अर्ज करण्यामागे अर्जदाराचा वाईट उद्देश असल्याचे स्पष्ट होते. सदर्हु अर्जासोबत अर्जदाराने कुठलाही सबळ कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही त्यामुळे अर्जदाराचा अर्ज हा रद्द होण्यास पात्र आहे. करिता अर्जदाराचा अर्ज हा दंडासह खारिज करण्यात यावा अशी विनंती केली.

**अर्जदार नं. २ सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी यांचा साक्षपुराव्याचा प्रतिज्ञालेख.**
मी प्रतिज्ञार्थी/अर्जदार नं. २ सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी वयः ५३ वर्षे, धंदाः घरकाम रा. सोमाणी अपार्टमेन्ट रामदास पेठ, आकोला, ता. जि. आकोला, याद्वारे शपथपुर्वक कथन करतो की, १. मी मौजे आकोला देथील रहीवाशी आहे. माझे पती प्रकाश सोमाणी यांना आर्थीक अडचणीमुळे तसेच व्यापार करण्याकरीता कर्जाउ रक्कमेची आवश्यकता होती. माझे पती यांनी विनोद झवर यांचे सोबत जवळचे संबंध असल्याने व त्यांचा कर्जाउ रक्कम व्याजाने देण्याचा धंदा असल्याने त्यांना डेव्हलपमेंटच्या व्यवसाया करीता कर्जाची मागणी केली होती. त्यावेळी विनोद झवर यांनी कर्जाउ रक्कम व्याजाने देण्याचे त्यांचे व्यवसायातील अटी व शर्ती वर मान्य केले होते.

२. विनोद हरसीविंदजी झवर यांनी कर्जाउ रक्कम देण्यापुर्वी दि. १२.०५.२०१५ रोजी माझे सासरे जानकीलाल बन्सीलाल सोमाणी यांचे नावावरील मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं.४३/१ प्लॉट नं.१५ खुला प्लॉट क्षेत्रफळ ६७६९.५४ चौ. फुट इसारचिठ्ठीत नमुद चतुसिमेतील स्थावरची भरणा पावती बनवुन नोटरी करून लिहुन नोंदवुन घेतला. या मध्ये रू.२५,००,०००/-(अक्षरी पंचवीस लाख) मध्ये सौदा झाल्याचे दर्शवुन पुर्ण रक्कम मिळाल्याचे नमुद करण्यात आले. या दस्तावर सह्या माझे समक्ष करण्यात आल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष रक्कम देण्याचा कोणताही व्यवहार झाला नाही. माझे पतीला रक्कमेची आवश्यकता जुन २०१५ नंतर असल्याने व विनोद झवर यांचे सोबत घनिष्ठ संबंध असल्याने आम्ही कोणतीही हरकत घेतली नाही. माझे पतीला व्यवसायाकरीता रू.४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख रुपये) कर्जाची आवश्यकता होती. माझे पती यांनी विनोद झवर यांना दि. ०१.०६.२०१५ रोजी कर्जाउ रक्कमेची मागणी केली. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी रक्कम मोठी असल्याने गहाणतारण म्हणुन चेकची व लेटरहेडवर रक्कम मिळाल्याची पोच बनवुन देण्याची मागणी केली. त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांनी माझे नावाचे लेटरहेड वर दि.०१.०६.२०१५ रोजी श्री. विनोदकुमार झवर यांचे नावाने रू.५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रूपये) मे. आदित्य कापरिशन यांचे मार्फत मिळाल्याचे लेटरहेडवर लिहुन घेतले. तसेच माझे नावाचे दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. आकोला मधील खात्याचे १० दिनांक नमुद नसलेले चेक विनोद हरगोविंदजी झवर यांचे नावाचे प्रत्येकी रुपये पाच लाख रक्कमेचे चेक सहया करून घेतले. त्यानंतर विनोद हरगोविंदजी झवर यांनी माझे पतीला आवश्यकते नुसार रक्कम देणे सुरू केले. माझे पती प्रकाश सोमाणी यांना रक्कम रु.३७,७७,६०८/- (अक्षरी रुपये सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) विनोद झवर यांनी कर्जाचे स्वरुपात द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने दिली होती. ३. आमचे मधील व्यवहार सुरळीत सुरू

होते घनिष्ठ संबंध असल्यामुळे व्याजाची रक्कम एकाच वेळी देण्याचे ठरले होते. माझे पतीने दि.१६.०६.२०१७ रोजी प्लॉट केल्यामुळे त्यांचेकडे मोठी रक्कम उपलब्ध असल्याने विनोद हरगोविंदजी झवर यांना रू.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख) नगदी देवुन हिशोबामध्ये जन्त केले. माझे पती नोटबंदी मुळे व आर्थीक मंदीमुळे विनोद हरगोविंदजी झवर यांना पुढील व्याज व राहीलेली रक्कम परत देवु शकलो नाही. त्यामुळे विनोद हरगोविंदजी झवर यांनी जानेवारी २०२० पासुन रक्कमे करीता वारंवार मागणी सुरू केली. तसेच कर्जाची दिलेली रक्कम विनोद हरगोविंदजी झवर यांची एकटयाची नसुन अन्य व्यक्तींची आहे त्यामुळे ते विनोद हरगोविंदजी झवर यांना रक्कमेची मागणी करीत आहेत असे सांगीतले. त्यावेळी माझे पती यांनी हिशोबाची मागणी केली. विनोद हरगोविंदजी झवर यांनी रक्कम जमा करते वेळी हिशोब करून घेवु अशी हमी दिली. विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाची रक्कम व्याजासह देणे शक्य नसल्यास गहाणतारण व प्रतिभुती म्हणुन स्थावर मालमत्तेचे खरेदीखत करून देण्याची मागणी केली. खरेदीखत करून न दिल्यास विनोद झवर यांच्या कडे असलेले माझे नावाचे दहा चेक वसुली करीता लावुन रक्कम कोर्टामार्फत केस दाखल करून वसुल करण्याची धमकी दिली.

४. विनोद हरगोविंदजी झवर यांचे वारंवार रक्कमेची मागणी वाढल्यामुळे व चेक च्या आधारे कोर्टाद्वारे वसुली करण्याची धमकी दिल्यामुळे माझे पतीने विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्ज व व्याजाचे मोबदल्यात त्यांचेकडे असलेल्या प्लॉट पैकी काही प्लॉटची खरेदी गहाणतारण व प्रतिभुती म्हणुन करून घेण्याची विनंती केली. त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांने माझे कुटूंबाचे मालकीचा मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं.४३/१ मधील प्लॉट नं.७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करून देण्याची मागणी केली. तसेच सदर प्लॉटचा भाव रू.२,२००/- प्रति फुट होता. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी आम्हाला व्यवसायाकरीता अधिकची रक्कम व्याजाने देण्यात येईल अशी हमी दिली. तसेच सदरची रक्कम प्लॉट ची शासकीय दराने होणारी किंमत दर्शवुन कर्ज म्हणुन चेकने देण्यात येईल तसेच त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी अशी हमी दिली की, कर्जाची व व्याजाची होणारी रक्कम परत दिल्यास सदर प्लॉटची खरेदी पलटवुन देण्यात येईल तसेच रक्कम न दिल्यास कर्जाचे व व्याजाचे हिशोब करून हिशोबानंतर होणारी रक्कम प्लॉटच्या किंमतीतुन रू. २,२५,५६,६००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे) मधुन वजा करून राहीलेली उर्वरीत रक्कम विनोद हरगोविंदजी झवर हे आम्हाला परत करतील. विनोद हरगोविंदजी झवर यांनी असे आश्वासन दिले परंतु आमचे कडील रक्कमेचा व्याजासह हिशोब केला नाही. तसेच जमा केलेली रक्कम रुपये पंचवीस लाख जमा केल्यानंतर किती रक्कम शिल्लक राहीली होती हे सांगीतले नाही.

५. माझे पतीचे विनोद हरगोविंदजी झवर यांचे सोबत मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे माझे पतीने प्लॉटचे नाममात्र खरेदीखत करून देण्यास होकार दिला. परंतु विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाच्या रक्कमे पैकी बरीच रक्कम ही कार्तीक विजय साव यांचे परीवाराची असल्याने त्याचे नावाने खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली. तसेच व्यवहारीक सोईचे दृष्टीने अर्ध्याजागेचे दोन खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली. आपसात ठरल्याप्रमाणे माझे पती यांनी विनोद हरगोविंदजी झवर यांचे सांगण्यावर कार्तीक विजय साव यांचे नावाने मौजे खडकी बु। ता. जि. आकोला येथील शेत सर्वे नं.४३/१ मधील प्लॉट नं. ७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ.मि. पैकी ४८२.०६ चौ.मि. प्लॉटचे नाममात्र खरेदीखत लिहुन नोंदवुन दिले ज्याचा दस्त नं. ३७७८/२०२० असुन दि.०५.११.२०२० आहे. त्याच दिवशी त्याच प्लॉट नं.७ मधील जागेतील उर्वरीत क्षेत्र ४७०.८८ चौ.मी. जागेचे दुसरे नाममात्र खरेदीखत लिहुन घेण्यात आले. सदरचा दस्त दि.०७.०१.२०२१ रोजी नोंदविल्या गेला असुन ज्याचा दस्त नं. २१९/२०२१ हा आहे. याच दिवशी कार्तीक विजय साव यांची आजी नामे सौ. लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचे नावावरील भाडेकरू असलेला फ्लॅट बळजबरीने खरेदीखत माझे पतीचे नावाने लिहुन नोंदवुन देण्यात आले. ज्याचा दस्त नं.३७६३/२०२० असुन दि.०५.०११.२०२० आहे. या फ्लॅट ची किंमत रू. १६,००,०००/- माझे पतीने दि. आकोला अर्बन को-ऑप बँक लि, आकोला शाखा आकोला यांचे चेक नं. ६६३९८८ नुसार दिली. यानंतर वारंवार हिशोबाची मागणी माझे पतीने विनोद झवर यांना केल्यानंतर त्यांनी हिशोब दिला. तसेच आमच्या कडे एकुण रक्कम रू.८९,७७,१५०/- बाकी असल्याचे हिशोबामध्ये नमुद करण्यात आले होते. विनोद हरगोविंदजी झंवर यांनी मुद्दल रक्कम रु.३७,७७,६०८/- वर मासिक २.७५ टक्के दराने चक्र.वाढ व्याज आकारूण एकुण व्याज रु.७६,९९,५४२/- (अक्षरी शहाहत्तर लाख नव्यांन्युव हजार पाचशे बेचाळीस) आकारले होते. त्यामुळे वाद निर्माण झाला. आमचे नातेवाईक व मध्यस्थ यांचे समक्ष विनोद झवर याने तडजोड केली. तसेच प्लॉट ची किंमत रू.२,२५,५६,६००/- (अक्षरी दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे रुपये) मधुन कर्जाची व व्याजाची ठरलेली रक्कम वजा करून राहीलेली रक्कम रू.९२,७६,६००/- (अक्षरी व्यान्युव लाख शहात्तर हजार सहाशे रुपये) विनोद झवर यांनी आम्हाला एका महीण्यात देण्याचे कबुल केले.

६. माझे पती यांनी विनोद झवर यांना दि.०७.०२.२०२१ रोजी राहीलेली रक्कम रू.९२,७६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) ची मागणी सुरू केली. परंतु विनोद झवर यांने कर्जाचा हिशोब व्याजासह बरोबर झाला. आता आमच्याकडे कोणतीही रक्कम राहीलेली नाही. तुमचे सहीचे चेक, लेटरपॅड, सासऱ्याची इसारचिठठी इ. कागदपत्र परत दिलेले आहेत. प्लॉट तुम्ही खरेदी करून दिलेला आहे. त्यामुळे व्यवहार पुर्ण झाला कोणतीही रक्कम मिळणार नाही तुम्हाला जे करावयाचे असेल ते करा या नंतर रक्कमेची मागणी करावयाची नाही तसेच फोन सुद्धा करावयाचा नाही असे स्पष्ट सांगीतले. विनोद झवर यांनी आमची अवैध सावकारी व्यवहारातुन फसवणुक व विश्वासघात करून रूपये सव्वा दोन कोटी किंमतीची मालमत्ता मुद्दल रक्कम व त्यावरील व्याजात हडप केली. त्यामुळे आम्हाला सदरची तक्रार दाखल करण्या शिवाय अन्य पर्याय राहीला नाही. वरील संपुर्ण व्यवहार हा माझे पती सोबत झाला असल्याने मला या व्यवहाराबाबत जी माहीती होती ती माझा साक्षपुरावा म्हणुन या प्रतिज्ञालेखाद्वारे शपथपूर्वक सादर करीत आहे.

**अर्जदार तर्फे साक्षीदार श्री. तेजस प्रकाश सोमाणी यांचा साक्षपुराव्याचा प्रतिज्ञालेख.**

मी प्रतिज्ञाथी श्री. तेजस प्रकाश सोमाणी वयः २९ वर्षे, चंदाः नकीली व्यवाय रा. सोमाणी अपार्टमेन्ट रामदास पेठ, आकोला, ता. जि. आकोला, याद्वारे शपथपुर्वक कथन करतो की,

१. मी मौजे आकोला येथील रहीवाशी आहे. माझे वडीलांना आर्थीक अडचणीमुळे तसेच व्यापार करण्याकरीता कर्जाउ रक्कमेची आवश्यकता होती. माझे वडील यांनी विनोद झवर यांना डेव्हलपमेंटच्या व्यवसायाकरीता कर्जाची आवश्यकता असल्याने रक्कमेची मागणी केली होती. त्यावेळी विनोद झवर यांनी कर्जाउ रक्कम व्याजाने देण्याचे त्यांचे व्यवसायातील अटी व शर्ती वर मान्य केले होते.

२. विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाउ रक्कम देण्यापुर्वी दि. १२.०५.२०१७ रोजी माझे आनोमा जानकीलाल बन्सीलाल सोमाणी यांचे नावावरील मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं.४३/१ प्लॉट नं.१५ खुला प्लॉट क्षेत्रफळ ६७६९.५४ चौ. फुट इसारचिठ्ठीत नमुद चतुसिमेतील स्थावरची भरणा पावती बनवुन नोटरी करून लिहुन नोंदवुन घेतला. या मध्ये रू.२५,००,०००/- (अक्षरी पंचवीस लाख) मध्ये सौदा झाल्याचे दर्शवुन पुर्ण रकम मिळाल्याचे नमुद करण्यात आले. सदरचा दस्त माझे समक्ष तयार करून त्यावर सह्या करण्यात आल्या होत्या. त्यावेळी प्रत्यक्ष रक्कम देण्याचा कोणताही व्यवहार झाला नाही. माझे वडीलांना रक्कमेची आवश्यकता जुन २०१५ नंतर असल्याने व विनोद झवर यांचे सोबत घनिष्ठ संबंध असल्याने माझे वडीलांनी कोणतीही हरकत घेतली नाही. माझे वडीलांना व्यवसायाकरीता रू.४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख रुपये) कर्जाची आवश्यकता होती. माझे वडीलांनी विनोद झवर यांना दि.०१.०६.२०१५ रोजी कर्जाउ रक्कमेची मागणी केली. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी रक्कम मोठी असल्याने गहाणतारण म्हणुन चेकची व लेटरहेडवर रक्कम मिळाल्याची पोच बनवुन देण्याची मागणी केली. त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांनी माझी आई सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी यांचे लेटरहेड वर दि. ०१.०६.२०१५ रोजी श्री. विनोदकुमार झवर यांचे नावाने रू. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रूपये) मे. आदित्य कापरिशन यांचे मार्फत मिळाल्याचे लिहुन घेतले. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी दहा लेटरहेडवर प्रत्येकी पाच लाख रूपये मिळाल्याचे लिहुन घेतले. तसेच माझी आई यांचे दि. आकोला अर्बन को-ऑप बँक लि. आकोला मधील खात्याचे १० दिनांक नमुद नसलेले चेक विनोद हरगोविंदजी झवर यांचे नावाचे प्रत्येकी रुपये पाच लाख रक्कमेचे चेक सहया करून माझे समोर घेतले. त्यानंतर विनोद हरगोविंदजी झवर यांचे माझे वडीलांना आवश्यकतेनुसार रक्कम देणे सुरू केले, विनोद हरगोविंदजी झवर यांनी दि.०९.०६.२०१५ रोजी रू. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये) दिले. त्यानंतर वेळोवेळी रक्कम देण्यात आली ही रक्कम विनोद झवर यांचे कडुन मी व माझे वडीलांनी आणलेली होती. विनोद झवर यांनी एकुण रक्कम रु.३७,७७,६०८/- (अक्षरी रुपये सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) कर्जाचे स्वरुपात द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने माझे वडीलांना दिली होती.

३. आमचे आपसातील व्यवहार सुरळीत सुरू होते. घनिष्ठ संबंध असल्यामुळे व्याजाची रक्कम एकाच वेळी देण्याचे ठरले होते. माझे वडीलांनी दि.१६.०६.२०१७ रोजी प्लॉट विक्री केल्यामुळे त्यांचेकडे मोठी रक्कम उपलब्ध असल्याने विनोद हरगोविंदजी झवर यांना रू. २५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख) नगदी देवुन हिशोबामध्ये जमा केले त्यावेळी मी त्यांच्या सोबत गेलो होतो. माझे वडील नोटबंदी मुळे व आर्थीक मंदीमुळे विनोद हरगोविंदजी झवर यांना पुढील व्याज व राहीलेली रक्कम परत देवु शकले नाही. त्यामुळे विनोद हरगोविंदची झवर यांनी जाने २०२० पासुन रक्कमे करीता वारंवार मागणी सुरू केली. तसेच कर्जाची

दिलेली रक्कम विनोद हरगोविंदजी झवर यांची एकटयाची नसुन अन्य व्यक्तींची आहे त्यामुळे ते विनोद हरगोविंदजी झवर रक्कमेची मागणी करीत आहेत असे सांगीतले. त्यावेळी आम्ही हिशोबाची मागणी केली. विनोद हरगोविंदजी झवर यांनी रक्कम जमा करते वेळी हिशोब करून घेवु अशी हमी दिली. विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाबी रक्कम व्याजासह देणे शक्य नसल्यास गहाणतारण व प्रतिभुती म्हणुन स्थावर मालमत्तेचे खरेदीखत करून देण्याची मागणी केली. खरेदीखत करून न दिल्यास विनोद झवर यांच्या कडे माझी आई सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी हिचे गहाणतारण असलेले सह्या केलेले दहा चेक वसुली करीता लावुन रक्कम कोर्टामार्फत केस दाखल करून वसुल करण्याची धमकी दिली.

४. विनोद हरगोविंदजी झवर यांचे वारंवार रक्कमेची मागणी वाढल्यामुळे व चेक च्या आधारे कोर्टाद्वारे वसुली करण्याची धमकी दिल्यामुळे माझे वडील यांनी विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्ज व व्याजाचे मोबदल्यात त्यांचेकडे असलेल्या प्लॉट पैकी काही प्लॉटची खरेदी गहाणतारण व प्रतिभुती म्हणुन करून घेण्याची विनंती केली.

त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांने माझे कुटूंबाचे मालकीचा मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं.४३/१ मधील प्लॉट नं.७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करून देण्याची मागणी केली. तसेच सदर प्लॉटचा भाव रू. २,२००/- प्रति फुट होता. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी माझे वडीलांना व्यवसायाकरीता अधिकची रक्कम व्याजाने देण्यात येईल अशी हमी दिली. तसेच सदरची रक्कम प्लॉट ची शासकीय दराने होणारी किंमत दर्शवुन कर्ज म्हणुन चेकने देण्यात येईल तसेच त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी अशी हमी दिली की, कर्जाची व व्याजाची होणारी रक्कम परत दिल्यास सदर प्लॉटची खरेदी पलटवुन देण्यात येईल तसेच रक्कम न दिल्यास कर्जाचे व व्याजाचे हिशोब करून हिशोबानंतर होणारी रक्कम प्लॉटच्या किंमतीतुन रुपये दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे मधुन वजा करून राहीलेली उर्वरीत रक्कम विनोद हरगोविंदजी झवर हे परत करतील. विनोद झवर यांनी असे आश्वासन दिले परंतु आमचे कडील रक्कमेचा व्याजासह हिशोब केला नाही. तसेच जमा केलेली रक्कम रुपये पंचदीस लाख जमा केल्यानंतर किती रक्कम शिल्लक राहीली होती हे सांगीतले नाही.

५. माझे वडीलांचे विनोद हरगोविंदजी झवर यांचे सोबत मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे माझे वडीलांनी प्लॉटचे नाममात्र खरेदीखत करून देण्यास होकार दिला. परंतु विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाच्या रक्कमे पैकी बरीच रक्कम ही कार्तीक विजय साव यांचे परीवाराची असल्याने त्याचे नावाने खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली. तसेच व्यवहारीक सोईचे दृष्टीने अर्ध्याजागेचे दोन खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली. आपसात ठरल्याप्रमाणे माझे वडीलांनी विनोद हरगोविंदजी झवर यांचे सांगण्यावरून कार्तीक विजय साव यांचे नावाने मौजे खडकी बु। ता. जि. आकोला येथील शेत सर्वे नं.४३/१ मधील प्लॉट नं.७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ.मि. पैकी ४८२.०६ चौ.मि. प्लॉटचे नाममात्र खरेदीखत लिहुन नोंदवुन दिले ज्याचा दस्त नं.३७७८/२०२० असुन दि.०५.११.२०२० आहे. या खरेदीमध्ये शासकीय दराने होणारी प्लॉट ची किंमत रु. ३४,३०,०००/- (अक्षरी चौतीस लाख तिस हजार रुपये) एच.डी. एफ.सी बँक लि, शाखा सेठी हाईट्स समोर आकोला चा चेक नं. ०००००५६ दि.०५.११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले. या खरेदीवर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. त्याच दिवशी त्याच प्लॉट नं.७ मधील जागेतील उर्वरीत क्षेत्र ४७०.८८ चौ. मी. जागेचे दुसरे नाममात्र खरेदीखत लिहुन घेण्यात आले. सदरचा दस्त दि.०७. ०१.२०२१ रोजी नोंदविल्या गेला असुन ज्याचा दस्त नं. २१९/२०२१ हा आहे. या खरेदीखतावर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. या खरेदीमध्ये शासकीय दराने होणारी प्लॉट ची किंमत रु. ३३,५०,०००/- (अक्षरी तेहत्तीस लाख पन्नास हजार रुपये) HDFC बँक लि, शाखा अकोला चा चेक नं. ०००००५५ दि. ०५. ११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले. याच दिवशी कार्तीक विजय साव यांची आजी नामे सौ. लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचे नावावरील भाडेकरू असलेला फ्लॅट चे खरेदीखत बळजबरीने माझे वडीलांचे नावाने लिहुन नोंददुक देण्यात आले. ज्याचा दस्त नं. ३७६३/२०२० असुन दि.०५.०११.२०२० आहे. या खरेदीखतावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. या फ्लॅट ची किंमत रू. १६,००,०००/- माझे वडीलांनी दि. आकोला अर्बन को-ऑप बँक लि, आकोला शाखा आकोला यांचे चेक नं.६६३९८८ नुसार दिली. यानंतर विनोद झवर यांना माझे वडीलांनी कर्जाच्या रक्कमेचा व्याजासह हिशोब करून देण्याची मागणी केली. विनोद झवर यांनी सुरूवातीला नंतर हिशोब करून देतो असे सांगीतले. वारंवार विनंती करूनही हिशोब न केल्यामुळे आम्ही नातेवाईक व मित्रपरीवार यांना घेवुन जावुन हिशोब मागीतला त्यावेळी विनोद झवर यांनी आमचे कर्ज खात्याचा हिशोब संगणकात दि.०१.११.२०१९ पर्यंतचा असलेला प्रिंट काढुन दिला व पुढील हिशोब विनोद झवर यांचे विश्वासु कर्मचारी अमीत काटकोरीया यांनी दि.०१.११.२०२० पर्यंत हाताने लिहुन दिएन. विनोद डागांनी त्यांचे संगणकात ठेवलेल्या नोंदीप्रमाणे आमचेकडे दि.१६.०६.२०१७ रोजी व्याजा सह रू. ५९.५४,८१०/- (अक्षरी एकोणसाठ लाख

चौपन्न हजार आठशे दहा रुपये) बाकी होते त्यामध्ये जमा केलेले रू.२५,००,०००/-वजा वजा करून माझे वडीलांकडे रु.३४,५४,८१०/- (अक्षरी चौतीस लाख चौपन्न हजार आठशे दहा) बाकी राहील्याचे दर्शविण्यात आले होते. त्यानंतर दि.०१.०७.२०१७ पासुन प्रत्येक महीण्याला व्याज आकारणी करून ती मुद्दलामध्ये मिळवीण्यात येऊन त्यावर पुन्हा व्याजाची आकारणी करण्यात आलेली होती. दि. ०१.११.२०२० पर्यंत चक्र.वाढ व्याज पद्धतीने आमच्या कडे एकुण रक्कम रू.८९,७७,१५०/- बाकी असल्याचे हिशोबामध्ये नमुद करण्यात आले होते. आम्ही जमा केलेली रक्कम रू. २५,००,०००/- मिळुन विनोद हरगोविंदजी झवर यांचा हिशोब रु. १,१४,७७,१५०/- झाला होता. विनोद हरगोविंदजी झवर यांनी मुद्दल रक्कम रु.३७,७७,६०८/- वर मासिक २.७५ टक्के दराने चक्र.वाढ व्याज आकारूण एकुण व्याज रु.७६,९९,५४२/- (अक्षरी शहाहत्तर लाख नव्यांन्युव हजार पाचशे बेचाळीस) आकारले होते. आपसात ठरल्याप्रमाणे आमचे सोबत विनोद हरगोविंदजी झवर यांनी केलेल्या करारानुसार रू.३७,७७,६०८/- कर्जाचे रक्कमेवर द.सा.द. शे.१८ टक्के व्याज दराने एका वर्षाचे व्याज रू.६,७९,९६८/- होत होते. तसेच साडेपाच वर्षाचे व्याज रू.३७,३९,८२८/- होत होते मुद्दल मिळुण एकुण रक्कम रू.७५,१७,४३६/- होत होती. त्यामधुन आम्ही जमा केलेले रू.२५,००,०००/- वजा करून माझे वडीलांकडे व्याजासह एकुण रक्कम रू.५०,१७,४३६/- बाकी राहत होती. आम्ही विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्जावरील व्याजावा दर द.सा.द.शे. १८ टक्के ठरला होता असे म्हटले असता, विनोद हरगोविंदजी झवर यांनी आम्ही मासीक ३ टक्के व्याज दराने रक्कम देतो त्यापेक्षा कमी व्याजदर आम्हाला परवडत नाही असे सांगीतले. जास्तीचे दराने व्याज आकारणी झाल्यामुळे आम्हाला दुप्पट व्याजाची रक्कम आकारल्या रोवली त्यामुळे वाद निर्माण झाला. त्यावेळी आमचे कुटूंबातील सदस्यांनी पुढील काळात पुन्हा फसवणुक होऊ नये व वाद वाढु नये म्हणुन व्यवहार त्याच दिवशी संपुष्टात आणण्याचे ठरविले. त्यावेळी नंदकिशोर बढे व, विजय थोरात यांचे समोर तडजोड होऊन व्याजात काही सुट देण्याचे ठरले. तसेच विनोद हरगोविंदजी झवर यांचे व्याजासह रू.६५,००,०००/-देण्याचे ठरले तसेच खरेदीमध्ये चेक ने दिलेली रक्कम रू. ६७,८०,०००/- ही रक्कम मिळवुन एकुण रू.१,३२,८०,०००/-(अक्षरी एक कोटी बत्तीस लाख एन्सी हजार रुपये) ही रक्कम प्लॉट ची किंमत रू.२,२५,५६,६००/- (अक्षरी दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे रुपये) मधुन वजा करून राहीलेली रक्कम रू.९२,७६,६००/- (अक्षरी व्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) विनोद झवर यांनी आम्हाला एका महीण्यात देण्याचे कबुल केले.

६. माझे वडील यांनी विनोद झवर यांना दि.०७.०२.२०२१ रोजी राहीलेली रक्कम रू.९२,७६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) ची मागणी सुरू केली. परंतु विनोद झवर यांने कर्जाचा हिशोब व्याजासह बरोबर झाला. आता आमच्याकडे कोणतीही रक्कम राहीलेली नाही. तुमचे लेटरपॅड, दिलेले चेक, आजोबांच्या नावाची इसारचिठ्ठी इ. कागदपत्र परत दिलेले आहेत. प्लॉट तुम्ही खरेदी करून दिलेला आहे. त्यामुळे व्यवहार पुर्ण झाला कोणतीही रक्कम मिळणार नाही तुम्हाला जे करावयाचे असेल ते करा या नंतर रक्कमेची मागणी करावयाची नाही तसेच फोन सुद्धा करावयाचा नाही असे स्पष्ट पणे माझे समोर माझे वडीलांना सांगीतले. विनोद झवर यांनी आमची अवैच सावकारी व्यवहारातुन फसवणुक व विश्वासघात करून रूपये दोन कोटी पंचविस लाख किंमतीची मालमत्ता फक्त रु.३७,७७,६०८/-(अक्षरी सदोतीस लाख सत्यात्तर हजार सहाशे आठ) मुद्दल रक्कम व त्यावरील व्याजात हडप केली. त्यामुळे आम्हाला सदरची तक्रार दाखल करण्या शिवाय अन्य पर्याय राहीला नाही. वरील संपुर्ण व्यवहार हा माझे वडीलांसोबत झालेला असुन मी प्रत्येक व्यवहाराच्या वेळेस त्यांच्यासोबत असल्याने व्यवहारा बाबत जी माहीती होती ती माझा साक्षपुरावा म्हणुन या प्रतिज्ञालेखाद्वारे शपथपुर्वक सादर करीत आहे.

**अर्जदार तर्फे साक्षीदार श्री. नंदकिशोर नथ्थुजी बढे यांचा साक्षपुराव्याचा प्रतिज्ञालेख.**

मी प्रतिज्ञाथी श्री. नंदकिशोर नथ्थुजी बढे वयः ६२ वर्षे, धंदाः व्यवसाय रा. आकोला नेत्र हॉस्पिटल जवळ, रामदास पेठ, आकोला ता. जि. आकोला, याद्वारे शपथपुर्वक कथन करतो की,

१. मी वरील पत्यावरील रहीवाशी आहे. माझे प्रकाश जानकीलाल सोमाणी यांचे सोबत ३५ वर्षापासुन घनिष्ठ मित्रत्वाचे संबंध आहेत. विनोद हरगोविंदजी झवर हे सावकारीचा धंदा करतात. प्रकाश सोमाणी हे व्यवसायाकरीता आवश्यकते नुसार विनोद झवर यांचेकडुन कर्जाउ रक्कम व्याजाने घेत होते. मला सुद्धा आर्थीक अडचणीत कर्जाची आवश्यकता होती. मी प्रकाश सोमाणी यांच्या ओळखीने विनोद हरगोविंदजी झवर यांचे कडुन चेक गहाणतारण ठेवुन कर्जाउ रक्कम मासिक ३ टक्के व्याजदराने घेतली होती. मी विनोद झवर यांचेसोबत कर्जाचे व्यवहार ३ ते ४ वेळा केले आहेत. आजही त्यांच्या कडे माझे कर्जास गहाणतारण व प्रतिभुती म्हणुन दिलेले सहया केलेले कोरे चेक जमा आहेत.

३. प्रकाश जानक
निवासी प्लॉट नं.
विजय साव यांचे

२. प्रकाश सोमाणी यांनी विनोद झवर यांचेकडुन त्यांचे वडील जानकीलाल बंसीलाल सोमाणी याचे नावावरील प्लॉट इसारपावती लिहुन घेवुन तसेच त्यांची पत्नी सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी यांचे खात्याचे दहा चेक बिनतारखेचे सह्या क घेवुन रु.३७,७७,६०८/- कर्ज रक्कम वेळोवेळी घेतली होती. यापैकी काही रक्कम घेण्याकरीता दोन ते तीन वेळा मी प्रकाश सोमाणी यांचे सोबत विनोद झवर यांचे ऑफीसवर गेलो होतो. प्रकाश सोमाणी यांनी दि.१६.०६.२०१७ रोजी त्यांचा प्लॉट विक्री केल्यानंतर मिळालेल्या वचनेपैकी रू.२५,००,०००/- विनोद झवर यांचे कर्ज व व्याजाची परतफेड म्हणुन जमा केले होते त्यावेळी मी प्रकाश सोमाणी व त्यांचा मुलगा तेजस यांचे सोबत श्री. विनोद झवर यांचेकडे गेलो होतो.

३. प्रकाश सोमाणी यांनी विनोद झवर यांचे सोबत चे कर्जाचे व्यवहारात त्यांचा मौजे खडकी येथील सर्वे नं. ४३/१ मधील प्लॉट नं.७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करून दिला होता. सदरचा प्लॉट कार्तीक विजय साव यांचे नावाने विनोद झवर यांनी लिहून नोंदवुन घेतला होता. ज्याचे दस्त नं.३७७८/२०२० दि. ०५.११.२०२० व दस्त नं.२१९/२०२१ दि. ०७.०१.२०२१ हे आहेत. सदरचे दस्त नोंदणी करतांना मी प्रकाश सोमाणी यांचे सोबत होतो.

४. प्रकाश सोमाणी यांनी मला त्यांचा विनोद झवर यांचे सोबत हिशोबा बाबत वाद झाल्याचे सांगीतले होते. तसेच विनोद झवर यांचा हिशोब करण्याकरीता त्यांच्या सोबत विनोद झवर यांचे कडे जाण्याकरीता बोलावीले होते. मी प्रकाश सोमाणी, तेजस सोमाणी व विजय थोरात यांचेसोबत विनोद झवर यांचे ऑफिसवर जानेवारी २०२१ च्या शेवटच्या आठवडयात गेलो होतो. विनोद झवर यांने आम्हाला २ ते ३ वे नंतर या म्हणुन परत पाठविले शेवटी वाद होऊन तडजोड करण्याचे ठरले विनोद झवर यांनी कर्जाची रक्कम रू. ३७,७७,६०८/- व प्रकाश सोमाणी यांनी जमा केलेले दि. १६. ०६.२०१७ रोजीचे रू.२५,००,०००/- ची नोंद असलेली संगणकातील हिशोबाची प्रत दिली. तसेच व्याजाची आकारणी योग्य असुन आम्ही दरमहा ३ टक्के व्याज चक्र.वाढ पद्धतीने घेतो असे सांगीतले. तसेच विनोद झवर यांनी माझी रक्कम व्याजासह रू. ८९,७७,१५०/- झालेली आहे. तसेच पुन्हा खरेदीच्या वेळी दिलेली रक्कम रू.६७,८०,०००/- असे एकुण १,५७,५७,१५०/- झाल्याचे सांगितले. विनोद झवर यांनी जास्त व्याज आकारल्यामुळे प्रकाश सोमाणी यांनी आजच हिशोब करून हिशोब बंद करा व व्यवहार संपुष्टात आना असे स्पष्टपणे सांगीतले त्यामुळे सर्वासमक्ष असे ठरले की, विनोद झवर यांची कर्जाची व व्याजाची रक्कम रू.६५,००,०००/- आणि खरेदीच्या वेळेस दिलेली रक्कम रु.६७,८०,०००/- असे एकुण १,३२,८०,०००/- प्लॉटची किंमत रू.२,२५,५६,६००/- मधुन कापुन घ्यावी आणि विनोद झर यांनी एक महीण्यात प्रकाश सोमाणी यांना रू.९२,७६,६००/- परत करावेत. विनोद झवर यांनी सर्वा समक्ष हिशोब कबूल करून रक्कम देण्याचे कबूल केले परंतु, नंतर एक महीण्याने व्यवहार पुर्ण झाला मी एक रुपयाही देणार नाही असे सांगीतले. त्यामुळे वाद निर्माण झाला. प्रकाश सोमाणी यांनी विनोद झवर यांचे विरूद्ध सावकारी व्यवहारातुन हडप केलेली मालमत्ता परत मिळण्याकरीता तक्रार दाखल केली आहे. या तक्रार प्रकरणात मी माझा साक्षपुरावा म्हणुन मला जी माहीती होती ती या प्रतिज्ञालेखाद्वारे शपथपुर्वक सादर करीत आहे.

**अर्जदार तर्फे साक्षीदार श्री. विजय शेषराव थोरात यांचा साक्षपुराव्याचा प्रतिज्ञालेख.**

मी प्रतिज्ञार्थी श्री. विजय शेषराव थोरात वयः वयस्क, धंदाः व्यवसाय रा. शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, आकोला ता. जि. आकोला, याद्वारे शपथपुर्वक कथन करतो की, १. मी वरील पत्यावरील रहीवाशी आहे. मी प्रकाश जानकीलाल सोमाणी यांना २५ वर्षापासुन पुर्णपणे ओळखतो. तसेच विनोद हरगोविंदजी झवर यांना ओळखतो ते सावकारीचा धंदा करतात. प्रकाश सोमाणी हे व्यवसायाकरीता आवश्यकते नुसार विनोद झवर कडुन कर्जाउ रक्कम व्याजाने घेत होते. प्रकाश सोमाणी यांना सन २०१५ मध्ये विनोद झवर यांनी त्यांचे वडील जानकीलाल बंसीलाल सोमाणी यांचे नावावरील प्लॉट नाममात्र इसारपावती लिहुन घेवुन कर्ज दिले होते. सदर इसारचिठ्ठीचा दस्त दि.१२.०५.२०१५ रोजी माझे समोर तयार करण्यात आला होता सरोज माझे समोर जानकीलाल सोमाणी व विनोद झवर यांनी सहया करून नोटरी केली होती.

२. प्रकाश सोमाणी यांनी विनोद झवर यांचे कडुन वेळोवेळी रु. ३७,७७,६०८/- व्याजाने घेतले होते हे मला माहीत होते. प्रकाश सोमाणी यांनी मला सोबत नेवुन माझे समोर दि.१६.०६. २०१७ रोजी रू. २५,००,०००/- विनोद झवर यांचे कर्ज व व्याजाची परतफेड म्हणुन जमा केले होते. प्रकाश जानकीलाल सोमाणी हे नोटबंदी मुळे व आर्थीक मंदीमुळे विनोद हरगोविंदजी झवर यांना पुढील व्याज व राहीलेली रक्कम परत देवु शकले नाही.

३. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी विनोद झवर यांचेसोबत चे कर्जाचे व्यवहारात त्यांचा मौजे खडकी येथील सर्वे नं.४३/१ मधील प्लॉट नं.७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करून दिला होता. सदरचा प्लॉट कार्तीक विजय साव यांचे नावाने विनोद झवर यांनी लिहुन नोंदवुन घेतला होता हे मला माहीत आहे.

४. प्रकाश सोमाणी यांनी मला त्यांचा विनोद झवर यांचेसोबत हिशोबाबाबत वाद झाल्याचे सांगीतले होते. तसेच विनोद झवर यांचा हिशोब करण्याकरीता त्यांच्या सोबत विनोद झवर यांचेकडे जाण्याकरीता बोलावीले होते. मी प्रकाश सोमाणी, तेजस सोमाणी, व नंदकिशोर बढे यांच्या सोबत विनोद झवर यांचे ऑफिसवर जानेवारी २०२१ च्या शेवटच्या आठवडयात गेलो होतो. विनोद झवर यांने आम्हाला २ ते ३ वेळा नंतर या म्हणुन परत पाठविले शेवटी वाद होऊन तडजोड करण्याचे ठरले विनोद झवर यांनी कर्जाची रक्कम रू.३७,७७,६०८/- व प्रकाश सोमाणी यांनी जमा केलेले दि.१६.०६.२०१७ रोजीचे रू.२५,००,०००/- ची नोंद असलेली संगणकातील हिशोबाची प्रत दिली. तसेच व्याजाची आकारणी योग्य असुन आम्ही दर महा ३ टक्के व्याज चक्र.वाढ पद्धतीने घेतो असे सांगीतले. तसेच विनोद झवर यांनी माझी रक्कम व्याजासह रू.८९,७७,१५०/- झालेली आहे. तसेच पुन्हा खरेदीच्या वेळी दिलेली रक्कम रू.६७,८०,०००/- असे एकुण रू.१,५७,५७,१५०/- झाल्याचे सांगीतले. विनोद झवर यांनी जास्त व्याज आकारल्यामुळे प्रकाश सोमाणी यांनी आजच हिशोब करून हिशोब बंद करा व व्यवहार संपुष्टात आना असे स्पष्टपणे सांगीतले त्यामुळे सर्वांसमक्ष असे ठरले की, विनोद झवर यांची कर्जाची व व्याजाची रक्कम रू.६५,००,०००/- आणि खरेदीच्या वेळेस दिलेली रक्कम रू.६७,८०,०००/- असे एकुण रू. १,३२,८०,०००/- प्लॉटची किंमत रू.२,२५,५६,६००/- मधुन कापुन घ्यावी आणि विनोद झवर यांनी एक महीण्यात प्रकाश जनकीलाल सोमाणी यांना रू.९२,७६,६००/- परत करावेत. विनोद झवर यांनी सर्वा समक्ष हिशोब कबूल करून रक्कम देण्याचे कबूल बौले परंतु नंतर एक महीण्याने व्यवहार पुर्ण झाला मी एक रुपयाही देणार नाही असे सांगीतले. त्यामुळे वाद निर्माण झाला. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी विनोद झवर यांचे विरूद्ध सावकारी व्यवहारातुन हडप केलेली मालमत्ता परत मिळण्याकरीता तक्रार दाखल केली आहे. या तक्रार प्रकरणात मी माझा साक्षपुरावा म्हणुन मला जी माहीती होती ती या प्रतिज्ञालेखाद्वारे शपथपुर्वक सादर करीत आहे.

**सदर प्रकरणात अर्जदार व त्यांचे साक्षीदार तसेच गैरअर्जदार व त्यांचे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्यात आला असून उलटतपासातून पुढील बाबी निदर्शनास आल्या आहेत.**

**अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांच्या दि. ११/०३/२०२४ व दि. २७/०५/२०२४ उलटतपासातून पुढील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.**

अर्जदार यांनी त्यांचे शिक्षण बी. एस.सी.अॅग्रीकल्चर झाले असून त्यांचा व्यवसाय बांधकाम व शेती असल्याचे सांगितले. तसेच ते बिल्डर असून त्यांनी पंचवीस ते तीस बांधकाम प्रोजेक्ट पुर्ण केल्याचे तसेच त्यांनी सदर बांधकाम काही स्वमालकीच्या जमिनीवर तर काही करार करून केल्याचे सांगितल. त्यांना पंचवीस ते तीस प्रोजेक्ट पैकी गैरकायदेशीर बांधकामाबाबत त्यांना महानगर पालिकेने नोटीसदिल्याचे आठवत नसल्याचे सांगितले. पंचवीस तीस प्रोजेक्ट पैकी रामदास पेठ येथील एक स्कीम असून रामदास पेठ येथील स्कीमवर महानगर पालिकेने गैरकायदेशीर बांधकामाबाबत त्यांच्यावर कार्यवाही केलेली आहे माझयावर महानगर पालिकेने मंजूर केलेल्या बांधकामाचे व्यतिरिक्त अतिरिक्त बांधकाम केले म्हणून महानगरपालिकेने कार्यवाही केलेली आहे. तसेच त्यांनी विनोद झवर यांचेशी त्यांचे मित्रत्वाचे घनिष्ठ संबंध होते ते आजरोजी मात्र जवळपास २०२१ पासून संपुष्टात आल्यानंतर झवर यांचेविरुध्द तक्रार केली असल्याचे मान्य नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी तक्रारीमध्ये नमुदनुसार कार्तिक साव यांचेसोबत त्यांचे सोबत इतर संबंध व व्यवहार सुध्दा नसल्याचे सांगितले. कार्तिक सोबत झालेल्या विक्रीची मालमत्ता त्यांच्या मालकीची असल्याने मालमत्ता विकली नसून गहाण म्हणून कार्तिक साव यांना विनोद झंवर यांचे सांगणेवरून खरेदीखत करून दिले. तसेच त्यांनी कार्तिक साव यांना विकलेल्या मालमत्तेशी विनोद झंवर यांचा संबंध नसल्याचे सांगितले. अर्जदार यांनी कार्तिक साव यांना दिलेल्या मालमत्तेसबंधी त्यांनी दिलेल्या धनादेशाद्वारे रक्कम मिळाली असून सदरचा धनादेश त्यांनी वटवला असल्याचे सांगितले. श्री प्रकाश सोमाणी यांनी कार्तिक सावकडून मालमत्ता विकत घेतली नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचेकडून त्याच दिवशी फ्लॅट विकत घेतला असून खरेदीखताची किंमत धनादेशाद्वारे त्यांना दिल्याचे सांगितले. श्रीमती लिलादेवी अग्रवाल या साव यांची आजी असल्याचे सांगितले. त्यांचे सोबत झालेला खरेदीखताची किंमत धनादेशाद्वारे दिली आहे. तसेच साव यांना खरेदी लिहून दिल्यानंतर व लिलादेवी अग्रवाल यांचेकडून खरेदी करून घेतल्यावर सदर तक्रार दाखल करेपर्यंत त्यांनी साव व अग्रवाल यांना कोणतीही नोटीस दिलेली नसल्याचे सांगितले.

तसेच सदर तक्रारीपुर्वी त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये किंवा या कार्यालयात पुर्वी हिंमत नसल्याने तक्रार केली नसल्याचे सांगि तसेच त्यांनी गहाणाबाबत व्यवहार झालेला असल्यास त्याबाबत तक्रार करावी लागेल याबाबत त्यांना कळल्याचे त्या सांगितले. तसेच व्यवहार खरा असल्याने मी तक्रार केली असल्याचे तसेच धनादेश अनादर प्रकरणी त्यांचेविरूध्द कोर्टात केसेस नसल्याचे सांगितले. श्री. राजेश राठी यांनी त्यांचेविरूध्द केसेस केल्या होत्या. त्यांचे वडीलांनी त्यांच्या मालकीच्या सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट नंबर १५ कोणाला विकला याबाबत त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. सदरचा फ्लॅट गजानन सोमाणी यांना विकलेला नाही. तसेच सदर तक्रार दाखल करणेपुर्वी जानकीलाल सोमाणी हे प्लॉट नंबर १५ चे मालक नव्हते मात्र मालक कोण होते हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांचे वडील हयात असताना विनोद झंवर यांचेविरूध्द पोलीसमध्ये किंवा या कार्यालयात तक्रार दाखल केली नसल्याचे त्यांनी सांगितले. ते आयकर भरणा करीत असून सन २०१९ ते २०२१ चे आयकर रिटर्न दाखल करणेबाबत निश्चीतपणे सांगु शकत नसल्याचे त्यांनी सांगितले. दि. ०५/११/२०२० रोजी साव व अग्रवाल यांचेसोबत झालेल्या व्यवहारासंबंधी नोंद त्यांचे आयकर भरणामध्ये घेण्यात आले किंवा कसे याबाबत त्यांना समजत नसल्याचे सांगून त्याबाबत त्यांचे सी. ए. ला माहिती असेल असे त्यांनी त्यांच्या उलटतपासात सांगितले.

**दि. २७/०५/२०२४ गैरअर्जदाराचे वकील श्री काणे यांचेकडून अर्जदार श्री सोमाणी यांचा शपथेवर उलटतपास**

त्यांच्या वडीलांच्या मालकीची सर्व्हे नं ४३/१ मधील प्लॉट नं १५ हा गोपाल सोमाणी यांना विकल्याचे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारकर्ते दाखल करते दिवशी प्लॉट क्र. १५ हा जानकीलाल सोमाणी यांच्या मालकीचा होता की कसे याबाबत ते काहीही सांगु शकत नाही. तसेच तक्रारीत नमूद केलेली प्लॉट नं १५ च्या भरणा पावतीवर ते स्वत: साक्षीदार होते म्हणून ही बाब नमूद केली आहे. त्यांचे वडील जानकीलाल व ते एकत्र राहत राहतात मात्र त्यांना अर्जदार यांच्या १००% व्यवहाराची माहीती नसल्याचे तसेच ते सन २०१९-२० मध्ये मरण पावल्याचे त्यांनी सांगितले. तक्रार दाखल करतेवेळी प्लॉट क्र. १५ चे मालक याबाबत चौकशी केली नव्हती मात्र त्यांचे वडीलांनी सदर प्लॉट विकल्याचे त्यांना सांगितले. तसेच त्यांचे वडील जीवंत असेपर्यंत त्यांनी सदर प्लॉटबाबत/व्यवहाराबाबत कुठेही/कोणाकडेही तक्रार दाखल केलेली नव्हती तसेच विनोद झंवर यांनी वडील जिवंत असेपर्यंत किंवा आजपर्यंत सदर प्लॉटबाबत कोणताही वाद उत्पन्न केलेला नाही असे सांगितले. सन २०२१ पुर्वीपासून सदरहू प्लॉटचा मालक कोण व ताबेदार कोण आहे याची त्यांना काहीही माहिती नाही. ते प्रकाश सोमाणी या नावाने प्रोप्रायटरशीप व्यवसाय करीत असून प्रोप्रायटरशीप फर्म असल्याबाबत कुठलेही प्रमाणपत्र प्राप्त केले नसून मात्र २०२५ पुर्वीपासूनचे बँक खाते उघडण्यात आले असून सदर खात्याकरीता धनादेश पुस्तिका प्राप्त करण्यात आलेल्या त्यांनी सांगितले नाही. तसेच त्यांनी सदर व्यवसायाशी त्यांच्या पत्नीचा कोणताही संबंध नसल्याचे तसेच तक्रारीत नमूद केलेले हे झंवर यांचेसोबत केलेले व्यवहार हे व्यवसायाशी संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विनोद झंवर यांनी तक्रारीमध्ये नमूद धनादेश अनादरीत झाल्याबाबत कुठलीही फिर्याद दाखल केली नाही. तक्रारीत नमूद केलेले धनादेश हे अर्जदार क्र. २ हिच्या ताब्यात असल्याचे सांगितले. अर्जदार क्र. २ हिचा विनोद झंवर यांचेशी काहीही संबंध असल्याने सदरहू धनादेश अर्जदार क्र. २ हिच्याकडे आहेत. प्रकाश सोमाणी या फर्मच्या नावाने कोणतेही खाते उतारे ठेवलेले नसल्याचे तसेच सदर व्यवसायामध्ये झालेल्या उत्पन्न समजण्याकरिता नोंदी जमा-खर्चाच्या नोंदी केल्याशिवाय कळू शकत नाही त्यामुळे याबाबत ते काहीही सांगू शकत नसल्याचे तसेच आयकर विवरणपत्र फर्मच्या नावाने भरल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. सन २०१५ पासून फर्मचे आयकर विवरणपत्र शोधून दाखल करू असे त्यांनी सगितले तसेच आयकर विवरणपत्रासाठी C.A. यांना द्यावयाची माहीती त्यांनी स्वत: दिलेली आहे. मात्र सन २०१५ ते २०२१ पर्यंत किती आयकर भरणा केला हे ते सांगू शकत नसल्याचे तसेच आयकर विवरण पत्राची माहिती CA यांना देतेवेळी तक्रारीत नमूद विनोद झंवर यांचेकडून घेतलेल्या रक्कमेबाबतची माहिती रोख रक्कम घेतल्याने दिलेली नसल्याचे त्यांनी सांगितले. विनोद झंवर यांचेसोबत कोणताच व्यवहार झालेला नसल्याने आयकर विवरण पत्र तयार करतेवेळी CA यांनी माहिती दिलेली हे म्हणणे त्यांनी अमान्य केले आहे. तक्रारीत नमूद केलेल्या रक्कमेबाबतच्या कोणतीही नोंदीबाबत त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे वडीलांच्या मालकीचा प्लॉट क्र. १५ हा वडीलांनी विक्री केला हे माहीती असून मात्र कोणाला विक्री केला हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. तक्रार दाखल करतेवेळी त्यांना विनोद झवर यांचेकडून कोणतीही रक्कम घ्यावयाची नव्हती असे म्हणता येणार नाही असे त्यांनी सांगितले. विनोद झंवर यांचेकडे रक्कम निघते याबाबत त्यांना नोटीस (लेखी) वा दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला नसल्याचे सांगितले. सदरच्या तक्रारीमध्ये विनोद झवर यांचेकडून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घ्यावयाची रक्कम वसूल करावी म्हणून सदरच्या तक्रारीमध्ये मागणी केलेली नाही असे सांगितले. विनोद झंवर यांच्यासोबत कोणताच व्यवहार झालेला नसल्याने दिवाणी दावा दाखल केलेला नाही

तसेच मैत्री संपुष्टात आल्याने दुश्मनी काढण्याकरीता सदरची तक्रार दाखल केलेली आहे हे म्हणणे त्यांनी त्यांचे उलटतपासात अमान्य केले आहे.

**दि. १२/०८/२०२४ रोजीचा श्री. तेजस प्रकाश सोमाणी यांचा उलटतपास ॲड. काणे यांचेकडून**

श्री. तेजस प्रकाश सोमाणी यांनी त्यांचे वडील प्रकाश व आई जान्हवी यांनी दिलेल्या पुराव्याचे वाचन केल्यानंतर पुरावा देत असल्याचे उलटतपासात सांगितले. दि. ०१/०९/२०२३ रोजी पुरावा दाखल करते वेळी त्यांचे वय २९ वर्ष असून आधार कार्ड जोडले असल्याचे सगितले. त्यांचे वडीलांचा मे. प्रकाश सोमाणी आणि सोमाणी बिल्डर्स या नावाने बांधकाम व्यवसाय असून त्यांच्याकडे शेती असल्याचे त्यांनी सांगितले. ते १८ वर्षाचे होण्यापुर्वीपासून त्यांचे वडील हा व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. सर्व्हे नं ४३/१ मधील प्लॉट नं १५ चे आज रोजी मालक कोण आहेत याबद्दल त्यांना माहित नसल्याचे सागितले. सदर प्लॉटचे मूळ मालक त्यांचे आजोबा जानकीलाल सोमाणी हे असून आजोबांनी सदरची मालमत्ता सन २०१७ मध्ये मृत्यूपुर्वी विकली मात्र कोणाला विकली ते त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. त्यांच्या आजोबांनी खरेदी करून दिलेल्या प्लॉटच्या खरेदी खताची प्रत रेकॉर्डवर दाखल केली असल्याचे सांगितले. ते तीन वर्षापासून वकिली करीत आहेत. दस्तावर सही करणेपुर्वी वाचुन समजुन सही करणे आवश्यक असल्याबाबत कळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दि. ०७/०१/२०२१ शेतीच्या नोंदविलेल्या खरेदी खतावर त्यांनी साक्षीदार म्हणून सही करतेवेळी सदर खरेदीखत वाचून समजून सही केली असून त्यावेळी वकीली व्यवसाय करीत असल्याचे

खरेदीवर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला निबंधक खरेदीमधील मजकूरासंबंधी चौकशी करीत नसल्याचे तसेच खरेदी खताच्या शेवटच्या पानावर सबरजिस्ट्रार ऑफीसकडून मारण्यात आलेल्या शिक्क्याच्या मजकूर काय लिहीला आहे ते त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. तसेच खरेदी खतावर साक्षीदार यांना स्वाक्षरी करतेवेळी वाचून समजून सही करीत आहात वा मजकूर बरोबर आहे असे निबंधक ऑफीसकडून विचारणा करणे हे कायद्याने बंधनकारक आहे हे म्हणणे चुकीचे असल्याचे सांगितले. धनादेश क्र. ०००००५५ हा धनादेश खरेदीखत लिहून देताना विकणाऱ्या व्यक्तीला सदर रक्कम प्राप्त झाली किंवा नाही याबाबत त्यांनी त्यांच्या वडीलांकडे चौकशी केली असता त्यांना रक्कम मिळालेली होती असे सांगितले. कार्तिक विजय साव यांचे सोबत आजपर्यंत फक्त खरेदीखत नोंदविण्याचे दिवशी त्यांची दोनवेळा भेट झालेली आहे. कार्तिक साव यांचे आजीकडून त्यांनी फ्लॅट विकत घेतला असून फ्लॅटची किंमत धनादेशाद्वारे दिलेली आहे. त्यांच्या वडीलांनी विकलेले प्लॉट व खरेदी केलेल्या फ्लॅट बाबतचा खरेदीखत रद्द करून मिळणेबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही असे सांगितले. तसेच लिलादेवी यांनी लिहून दिलेल्या फ्लॅटच्या खरेदीखत रेकॉर्डवर दाखल केले आहे असल्याचे सांगितले. लिलादेवी अग्रवाल यांचेकडून विकत घेतलेल्या फ्लॅट संबंधी कोणताही वाद आजपर्यंत उपस्थित केलेला नाही असे सांगितले. तसेच त्यांनी कोणाकडून किती रक्कम घेणे बाकी निघते हे निश्चीत करण्याकरिता तीन चार वर्षापासून व्यवहार असलेले तरी हिशोब लिहून ठेवणे याची आवश्यकता नसल्याचे त्यांच्या वडीलांनी त्यांचे व्यवहारांचे हिशोब लिहून ठेवले काय याबाबत ते सांगू शकत नाही असे सांगितले. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा हिशोब लिहीलेला नाही व विनोद झवर यांचेकडून मिळालेल्या हिशोबांच्या कागदपत्रावरून ते सांगत आहेत असे सांगितले.
त्यांच्या आईचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले आहे. त्यांच्या आईचा वडीलांचे व्यवहारांशी काही संबंध नव्हता हे म्हणणे अमान्य केले आहे. त्यांच्या आईकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नसल्याचे तसेच त्यापुर्वी त्यांच्या आईकडे उत्पनाचा कुठलाही स्वोत नव्हता असे उलटतपासात सांगितले.

**अर्जदार क्र. २ यांची गैरअर्जदारांचे वकील ॲड. श्री. काळे यांचेकडून उलटतपास दि. ०७/१०/२०२४**

सौ जान्हवी प्रकाश सोमाणी यांचे एम.ए. पर्यंत शि क्षण असून त्या गृहिणी असून त्यांचेकडे उत्पनाचे साधन नाही. प्रकाश सोमाणी बिल्डरशीप करित असून प्रकाश सोमाणी यांना व्यवसायातून नुकसान झाले याबाबत घरात होणाऱ्या चर्चेवरून तसेच बँकच्या कागदपत्रे पाहिली असून त्यांना नुकसान झाले आहे याबाबत त्यांना माहिती असल्याचे त्यांनी सगितले तसेच त्यांचे बँकेत खाते उघडतांना त्यांचे उत्पन्न दाखविले की नाही याबाबत त्यांना आठवत नाही असे सांगितले. सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट क्र. १५ हा कोणाला विकला याबाबत माहित नसून पुन्हा तो विकला मात्र कोणाला विकला ते आठवत नाही असे सांगितले. सदरहू प्लॉट हा जानकीलाल यांनी विनोद झंवर यांना विकलेला नाही असे सांगितले. कोणत्याही कागदावर वाचून सही केली पाहीजे हे म्हणणे

खरे असल्याचे सांगितले. पुराव्यात नमुद १० चेक्स आजरोजी त्यांच्याच ताब्यात असून त्यांचे लग्न झाले त्या वेळेपासून त विनोद झंवर यांना ओळखत असून प्रकाश सोमाणी व झंवर यांचे असून घरगुती संबंध होते आजरोजी मात्र त्यांचेशी आम वादविवाद झालेले असल्याचे सांगितले. श्री. प्रकाश सोमाणी यांनी बँकेतून किती कर्ज घेतले ते त्यांना आठवत नसल्याचे तसेच श्री. विनोद झंवर यांचेशी पैशाच्या देणे-घेणे बाबत कोणताही लेखी करार झालेला नाही हे खरे आहे असे सांगितले. त्या व्यवहार झाल्यापासून कार्तिक साव यांना ओळखत असल्याचे सांगितले. लिलादेवी अग्रवाल यांचेकडून श्री. प्रकाश सोमाणी यांनी फ्लॅट विकत घेतलेला आहे हे म्हणणे खरे आहे असे सांगितले. लिलादेवी अग्रवाल यांचेविरूध्द आजपर्यंत पोलीसांकडे तक्रार केलेली आहे किंवा कसे/ह्यांचेविरूध्द कोणताही केस न्यायालयात दाखल केलेली नाही हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. कार्तिक साव व लिलादेवी अग्रवाल यांच्यातील झालेल्या व्यवहारात त्यांची स्वाक्षरी/सही आहे की नाही हे त्यांना आठवत नाही असे सांगितले. सदरचे खरेदी खत करतेवेळी खरेदी विक्री कार्यालयात त्या हजर नव्हत्या त्यांनी असे सांगितले. कार्तिक साव व लिलादेवी अग्रवाल यांच्यातील स्थावर खरेदी-विक्री व्यवहारातील घेणे-देणे रक्कम माहिती असल्याचे सांगितले. लिलादेवी अग्रवाल यांनी विकलेल्या फ्लॅटचे आम्ही मालक आहोत असे सांगितले. लिलादेवी अग्रवाल यांच्यासोबत झालेल्या फ्लॅट विक्रीचा व्यवहार रद्द करणेबाबत न्यायालयात दावा दाखल केल्याचे त्यांना आठवत नाही. प्लॉटच्या खरेदी व्यवहाराबदल्यात फ्लॅटचा व्यवहार केला होता हे म्हणणे त्यांनी अमान्य केले. प्लॉट विकण्याचा व फ्लॅट विकत घेण्याचा व्यवहार एकाच वेळी ठरला होता हे म्हणणे त्यांनी अमान्य केले. लिलादेवी अग्रवाल यांचेविरूध्द या कार्यालयात तक्रार दाखल केली होती का याबाबत त्यांना आठवत नाही. श्री विनोद झंवर यांचेसोबत रक्कम व्याजाने देण्या-घेण्याचा व्यवहार झालेला आहे हे म्हणणे त्यांनी अमान्य केले. श्री. विनोद झंवर यांचेशी पटत नसल्याने खोटी तक्रार दाखल केली आहे हे म्हणणे त्यांनी अमान्य केले. श्री. विनोद झंवर यांचेकडून पैसे घेणे वसुलीबाबत न्यायालयामध्ये कोणताही दावा दाखल केला नसून आजपर्यंत लेखी स्वरूपात मागणीची लेखी नोटीस दिलेली नाही हे म्हणणे खरे आहे असल्याचे मान्य केले आहे. त्या आयकार भरणा करीत नसल्याचे त्यांनी त्यांच्या उलटतपासात सांगितले.

**दि. २१/१०/२०२४ रोजी अर्जदाराचा साक्षीदार क्र. ०४ श्री. विजय शेषराव थोरात यांचा उलटतपास वकील श्री. काणे यांच्याकडून घेतला**

श्री. विजय शेषराव थोरात हे व्यवसाय काय करतो ते शपथपत्रात उल्लेख नसून ते बांधकाम ठेकेदारी व्यवसाय व प्रकाश सोमाणी बिल्डरसिप काम करीत असून त्यांनी सोमाणीच्या हाताखाली काम केले हे खरे आहे असे सांगितले. त्यांचा व सोमाणी यांचा पैसे घेणे देणे व्यवहार व्हायचा हे खरे आहे तसेच सोमाणी म्हणतात ते काम करावे लागते हे म्हणणे खरे आहे असे सांगितले. सोमाणी यांनी झंवर यांचेकडून किती व केव्हा रक्कम घेतली याबाबत त्यांना माहित असून त्याचा उल्लेख शपथपत्रात नाही हे खरे आहे असे त्यांनी सांगितले. इसारामधील प्लॉट क्र.१५ आठवतो गट नं. आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. इसारमधील लिहुन घेणार विनोद झंवर व देण्यार जानकीलाल सोमाणी असून सदर सौदयाची रक्कम किती ते आठवत नसल्याचे तसेच साक्षीदार स्वत: सांगतात की, इसार लिहिला रक्कम दिली नसल्याचे सांगितले. सदर प्लॉटचे खरेदीखत सोमाणी यांना झंवर यांनी करुन दिली नाही असे सांगितले. सोमाणी यांनी सदर प्लॉट कोणाला व कितीला विकला हे माहित नसल्याचे सांगितले. सदरहु इसार झाल्यानुसार खरेदी झाली नाही तरी देखील इसार रद्य झाला नाही हे म्हणणे खरे असल्याचे सांगितले.
झंवर विरुध्द सोमाणी यांनी इसारपावतीनुसार कुठेही वाद उपस्थित केला नाही तसेच सोमाणी यांचेविरुध्द झंवर यांनी रक्कम वसुलीकरिता कुठलाही वाद न्यायालयात उपस्थित केला नसल्याचे सांगितले. त्यांनी वाचले आहे की, सोमाणी यांनी प्लॉट मिळणेकरिता केस दाखल केली. सदरची तक्रार ही झंवर व कार्तिक सांव यांचे विरोधात दाखल केली तसेच कार्तिक साव यांचे नावाने झंवर यांचे सांगण्यावरुन दोन खरेदीखत करुन दिली आहेत असे सांगितले. दोन्ही खरेदीखत वेगवेगळया तारखांना झाली असून रक्कम कोणी दिली कार्तिक साव यांनी दिली.

सोमाणी याचा कार्तीक साव यांचे आजी बरोबर व्यवहार झाला हे खरे आहे. कार्तिक साव यांचे आजीचा व्यवहार मोबदल्याचा होता हे त्यांना माहीत नसल्याचे सांगितले. कार्तिक साव यांचेसोबत खरेदीखताचा व्यवहार कधी झाला त्याची तारिख त्यांना आठवत नाही. कार्तिक सावच्या आजीशी झालेल्या प्लॉटच्या खरेदीची माहिती ऐकून आहे मात्र खरेदीखत पाहिलेले नाही व हजर नसल्याचे सांगितले. पैसे वसूल करुन मिळावे म्हणून सदरची केस प्रकाश सोमाणी यांनी दाखल केली आहे असे फक्त म्हणावयाचे आहे. मात्र किती रक्कम वसुली म्हणून मागितली हे त्यांना माहित नाही असे त्यांनी सांगितले. या प्रकरणात सोमाणी यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द काय काय मागणी केली हे त्यांना माहित नाही असे सांगितले. कार्तिक सांव यांचे आजीने करुन

दिलेल्या खरेदीखताबाबत कुठेही कुठला वाद उपस्थित केला नाही, हे म्हणणे खरे आहे असे सांगितले. त्यांनी दिलेली साक्ष ऐकून घेतलेल्या माहितीच्या आधारे व सोमाणी यांनी सांगितल्याप्रमाणे बरोबर दिली नाही असे उलटतपासात सांगितले.

**<u>अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी लेखी युक्तीवाद दाखल केला तो थोडक्यात खालीलप्रमाणे :-</u>**

1. अर्जदार यांचे विनोद हरगोविंदजी झवर यांचे सोबत घनिष्ठ संबंध होते. विनोद हरगोविंदजी झवर हे सावकारीचा धंदा व्यवसाय करतात. अर्जदारला आर्थीक अडचणीमुळे तसेच व्यापार करण्याकरीता कर्जाउ रक्कमेची आवश्यकता होती. म्हणून अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांना डेव्हलपमेंटच्या व्यवसायाकरीता कर्जाची आवश्यकता असल्याने रक्कमेची मागणी केली होती. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाउ रक्कम व्याजाने देण्याचे त्यांचे व्यवसायातील अटी व शर्ती वर मान्य केले होते.

2. विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाउ रक्कम देण्यापुर्वी दि. १२.०५.२०१५ रोजी अर्जदार क्र. १ यांचे वडील जानकीलाल बन्सीलाल सोमाणी यांचे नावावरील मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं. ४३/१ प्लॉट नं.१५ खुला प्लॉट क्षेत्रफळ ६७६१.५४ चौ. फुट इसारचिठ्ठीत नमुद चतुसिमेतील स्थावरची भरणा पावती बनवुन नोटरी करून लिहुन नोंदवून घेतला जो पान क्र. ५९ वर आहे. या मध्ये रु. २५,००,०००/- (अक्षरी पंचवीस लाख) मध्ये सौदा झाल्याचे दर्शवुन पुर्ण रक्कम मिळाल्याचे नमुद भरण्यात आले व सदर बॉन्ड हा दी ६.४.२०१५ रोजीचा आहे, व दी १२.५.२०१५ रोजी नोटरी केलेला आहे.
परंतु त्यावेळेस सदर मालमत्तेची बाजारभाव किंमत अंदाजे १.४० कोटी रूपये होती. परंतु प्रत्यक्ष रक्कम देण्याचा कोणताही व्यवहार झाला नाही. अर्जदाराला रक्कमेची आवश्यकता जुन २०१५ नंतर असल्याने व विनोद हरगोविंदजी झवर यांचे सोबत घनिष्ठ संबंध असल्याने अर्जदाराने कोणतीही हरकत घेतली नाही. अर्जदाराला व्यवसायाकरीता रु.४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख रुपये) कर्जाची आवश्यकता होती. अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांना दि. ०१.०६.२०१५ रोजी कर्जाउ रक्कमेची मागणी केली. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी त्यांच्या अटी व शर्ती प्रमाणे गहाणतारण म्हणून चेकची व लेटरहेडवर रक्कम मिळाल्याची पोच बनवुन देण्याची मागणी केली. त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांनी अर्जदार क्र. २ यांचे लेटरहेड वर दि.०१.०६.२०१५ रोजी श्री. विनोदकुमार झवर यांचे नावाने रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रुपये) मे. आदित्य कॉर्पोरेशन यांचे मार्फत मिळाल्याचे लिहुन दिले. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी ९ लेटरहेडवर प्रत्येकी पाच लाख रुपये मिळाल्याचे लिहुन घेतले. तसेच अर्जदार क्र. २ चे दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. आकोला मधील खात्याचे दिनांक नमुद नसलेले १० चेक विनोद हरगोविंदजी झवर यांचे नावाचे प्रत्येकी रुपये पाच लाख रक्कमेचे चेक सहया करून घेतले. सदर लेटरहेड व चेक हे पान क्र. १५४ ते १७३ वर आहेत. त्यानंतर विनोद हरगोविंदजी झवर यांनी अर्जदाराला आवश्यकते नुसार रक्कम देणे सुरु केले.

3. विनोद हरगोविंदजी झवर यांनी खालील प्रमाणे रक्कम दिली.
दि.०९.०६. २०१५ रोजी रु.३,००,०००/-दि.१९.०६.२०१५ रोजी रु.२,००,०००/-,दि.२५.०६. २०१५ रोजी रु.२,००,०००/- दि.३०.०६.२०१५ रोजी रु. ३,००,०००/-,दि.०४.०७.२०१५ रोजी रु.१,००,०००/-,दि. ०६. ०२०१५ रोजी रु.१,५०,०००/- दि.३०.०७.२०१५ रोजी रु.५,००,०००/-,दि.१९.०८.२०१५ रोजी रु.३,५०,०००/-,दि.०३.०९.२०१५ रोजी रु.२,००,०००/- दि.१५.०९.२०१५ रोजी रु.५०,०००/-,दि.२९.०९.२०१५ रोजी रु.३,००,०००/-,दि.०१.१०.२०१५ रोजी रु.३०,०००/-, दि.१०.१०.२०१५ रोजी रु.५०,०००/-,दि.१०.११.२०१५ रोजी रु.५०,०००/-,दि.२८. ११.२०१५ रोजी रु.२०,०००/-,दि.३०.११.२०१५ रोजी रु. १,५०,०००/-,दि.०१.१२.२०१५ रोजी रु.३,००,०००/-,दि. ३०.१२.२०१५ रोजी रु.३०,०००/-,दि.०५.०१.२०१६ रोजी रु. ५,००,०००/- आणि दि.०७.०१.२०१६ रोजी रु.४,४७,६०८/-अशी एकूण रक्कम रु.३७,७७,६०८/- (अक्षरी रुपये सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) विनोद झवर यांनी कर्जाचे स्वरुपात द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने अर्जदाराला दिली होती.

4. अर्जदार व विनोद झवर यांचे आपसातील व्यवहार सुरळीत सुरू होते. घनिष्ठ संबंध असल्यामुळे व्याजाची रक्कम एकाच वेळी देण्याचे ठरले होते. अर्जदाराचे वडीलांनी ज्या मालमत्तेचा इसार केला तो प्लॉट नं. १५ दि. २९. ०५.२०१७ रोजी दस्त नं. १६१८ नुसार विक्री केला, या आलेल्या रक्कमेतून दि.१६.०६.२०१७ रोजी विनोद हरगोविंदजी झवर यांना रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख) नगदी देवुन हिशोबामध्ये जमा केले. आमचे आपसातील व्यवहार सुरळीत सुरु होते.

5. नोटबंदी मुळे व आर्थीक मंदीमुळे अर्जदार विनोद हरगोविंदजी झवर यांना पुढील व्याज व राहीलेली रक्कम परत देवु शव नाही. त्यामुळे विनोद हरगोविंदजी झवर यांनी जानेवारी २०२० पासुन व्याज व मुद्दल रक्कमे करीता वारंवार मागणी सु केली. तसेच कर्जाची दिलेली रक्कम विनोद हरगोविंदजी झवर यांची एकटयाची नसुन अन्य व्यक्तींची आहे व ते विनो हरगोविंदजी झवर यांना रक्कमेची मागणी करीत आहे असे संगितले गेले. त्यावेळी विनोद झवर हे अवाजवी रक्कमेच मागणी करील आहे, असे दिसल्यामुळे अर्जदाराने हिशोबाची मागणी केली. तेव्हा विनोद हरगोविंदजी झवर यांनी रक्कम जमा करते वेळी हिशोब करून घेवु अशी हमी दिली.

6. विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाची रक्कम व्याजासह देणे शक्य नसल्यास माझ्या इतर स्थावर मालमत्तेचे गहाणतारण व प्रतिभुती म्हणून खरेदीखत करून देण्याची मागणी केली. तसेच खरेदीखत करून न दिल्यास विनोद हरगोविंदजी झवर यांच्या कडे असलेले अर्जदार क्र. २ चे दहा चेक वसुली करीता लावुन रक्कम कोर्टामार्फत केस दाखल करून वसुल करण्याची धमकी दिली.

7. विनोद हरगोविंदजी झवर यांचे वारंवार रक्कमेची मागणी वाढल्यामुळे व चेक च्या आधारे कोर्टाद्वारे वसुली करण्याची धमकी दिल्यामुळे अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्ज व व्याजाचे मोबदल्यात माझेकडे असलेल्या प्लॉट पैकी काही प्लॉटची खरेदी गहाणतारण व प्रतिभुती म्हणून करून घेण्याची विनंती केली. त्यानुसार विनोद हरगोविंदजी झवर यांने अर्जदाराचे कुटूंबाचे मालकीचा मौजे खडकी बु। येथील शेत सर्वे नं. ४३/१ मधील प्लॉट नं.७क्षेत्रफळ ९५२.९४ चौ. मिटर (१०२५३.६३ चौ. फुट) प्लॉट खरेदी करून देण्याची मागणी केली. तसेच त्यावेळेस सदर प्लॉटचा भाव रु. २,२००/- (अक्षरी दोन हजार दोनशे रूपये) प्रति फुट होता. त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी अर्जदाराला दिलेली रक्कम प्लॉटच्या रकमे पेक्षा जास्त असल्याने व्यवसायाकरीता अधिकची रक्कम व्याजाने देण्यात येईल अशी हमी दिली. तसेच सदरची रक्कम प्लॉट ची शासकीय दराने होणारी किंमत दर्शतुन कर्ज म्हणुन चेकने देण्यात येईल असे संगितले. तसेच त्यावेळी विनोद झवर यांनी अशी हमी दिली की, कर्जाची व व्याजाची होणारी रक्कम परत दिल्यास सदर प्लॉटची खरेदी पलटवुन देण्यात येईल तसेच रक्कम दिल्यास कर्जाचे व व्याजाचे हिशोब करून हिशोबानंतर येणारी रक्कम प्लॉटच्या किंमतीतुन म्हणजेच रु.२,२५,५६,६००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे) मधुन वजा करून राहीलेली उर्वरीत रक्कम विनोद हरगोविंदजी झवर हे अर्जदाराला परत करतील. विनोद झतर यांनी असे आश्वासन दिले परंतु त्यावेळेस अर्जदारा कडील रक्कमेचा व्याजासह हिशोब केला नाही. तसेच जमा केलेली रक्कम रु.२५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख) जमा केल्यानंतर किती रक्कम शिल्लक राहीली होती हे सुद्धा सांगीतले नाही.

8. अर्जदाराचे व विनोद हरगोविंदजी झवर यांचे सोबत मित्रत्वाचे संबंध असल्यामुळे अर्जदाराने प्लॉटचे नाममात्र प्रतिभूती म्हणून खरेदीखत करून देण्यास होकार दिला. परंतु विनोद हरगोविंदजी झवर यांनी कर्जाच्या रक्कमे पैकी मोठी रक्कम ही कार्तीक विजय साव यांचे परीवाराची असल्याने त्याचे नावाने खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली. तसेच व्यवहारीक सोईचे दृष्टीने अध्र्याजागेचे दोन खरेदीखत लिहुन नोंदवुन देण्याची मागणी केली.

9. आपसात ठरल्याप्रमाणे अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांचे सांगण्यावरून कार्तीक विजय साव यांचे नावाने मौजे खडकी बु। ता.जि. आकोला येथील शेत सर्वे नं. ४३/१ मधील प्लॉट नं. ७ क्षेत्रफळ ९५२.९४ चौ.मि. पैकी ४८२. ०६ चौ.मि. प्लॉटचे नाममात्र खरेदीखत लिहुन नोंदवुन दिले ज्याचा दस्त नं. ३७७८/२०२० असुन दि.०५.११.२०२० आहे. जे प्रकरणात पान क्र. ६२ ते १०४ वर आहे. या खरेदीमध्ये शासकीय दराने होणारी प्लॉट ची किंमत रु. ३४,३०,०००/-(अक्षरी चौतीस लाख तिस हजार रुपये) एच.डी. एफ.सी बैंक लि. शाखा सेठी हाईट्स समोर आकोला चा चेक नं. ०००९५६, दि.०५.११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले.

10. त्याच दिवशी त्याच प्लॉट नं. ७ मधील जागेतील उर्वरीत क्षेत्र ४७०.८८ चौ.मी. जागेचे दुसरे नाममात्र प्रतिभूती म्हणून खरेदीखत लिहून घेण्यात आले. परंतु तांत्रिक अडचणी मुळे याची नोंदणी होऊ शकली नाही. सदरचा खरेदी दस्त दि.०७.०१.२०२१ रोजी नोंदविल्या गेला असुन ज्याचा दस्त नं. २१९/२०२१ हा आहे. जे प्रकरणात पान क्र. १०५ ते १५२ वर आहे. या खरेदीमध्ये शासकीय दराने होणारी प्लॉट ची किंमत रु.३३,५०,०००/- (अक्षरी तेहतीस लाख पन्नास हजार रुपये) एच.डी.एफ.सी बँक लि. शाखा सेठी हाईट्स समोर आकोला चा चेक नं. ०००९५५ दि.०५.११.२०२० ने दिल्याचे दर्शविण्यात आले.

11. दि ५.११.२०२० रोजीच कार्तीक विजय साव यांची आजी नामे सौ. लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचे नावावरील भाडेकरू असलेला फ्लॅट घ्यावाच लागेल अशी बळजबरी करून विनोद हरगोविंदजी झवर व कार्तीक विजय साव यांनी फ्लॅट चे खरेदीखत अर्जदाराचे नावाने लिहुन नोंदवुन दिले. ज्याचा दस्त नं.३७६३/२०२० असुन दि.०५.०११.२०२० आहे. जे

प्रकरणात पान क्र. १७४ ते २०० वर आहे. या पलॅट ची किंमत रु.१६,००,०००/- (अक्षरी सोळा लाख रुपये) अर्जदाराने दि. अकोला अर्बन को-ऑप बँक लि. अकोला शाखा अकोला यांचे चेक नं. ६६३९८८ नुसार दिली.

12. या नंतर अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्जाच्या रक्कमेचा व्याजासह हिशोब करून देण्याची मागणी केली. विनोद हरगोविंदजी झवर यांनी सुरुवातीला नंतर हिशोब करून देतो असे सांगीतले. वारंवार विनंती करूनही हिशोब न केल्यामुळे अर्जदाराने त्याचे नातेवाईक व मित्र परीवार यांना घेवुन जावुन हिशोब मागीतला त्यावेळी विनोद हरगोविंदजी झवर यांनी अर्जदाराचे कर्ज खात्याचा हिशोब संगणकात दि.०१.११.२०१९ पर्यंतचा असलेला प्रिंट काढुन दिला व पुढील हिशोब विनोद हरगोविंदजी झवर यांचे कर्मचारी अमित काटकोरीया यांनी दि.०१.११.२०२० पर्यंत हाताने लिहून दिला जे प्रकरणात पान क्र. २०२ ते २०३ वर आहे. विनोद हरगोविंदजी झवर यांचे अतिशय विश्वसनीय असल्यामुळे अमित काटकोरीया यांनी इसारचिठ्ठी/भरणापावती वर (जे प्रकरणात पान क्र. ५९ ते ६१ वर आहे) सुद्धा साक्षीदार म्हणून सही केली होती. विनोद हरगोविंदजी झवर योनी त्यांचे संगणकात ठेवलेल्या नोंदी प्रमाणे अर्जदाराकडे दि.१६.०६.२०१७ रोजी व्याजासह रु. ५९,५४,८१०/- (अक्षरी एकोणसाठ लाख चौपन्न हजार आठशे दहा रुपये) बाकी होते. त्यामध्ये जमा केलेले रु.२५,००,०००/- वजा करून अर्जदाराकडे रु. ३४,५४,८१५०/-(अक्षरी चौतीस लाख चौपन्न हजार आठशे दहा) बाकी राहील्याचे दर्शविण्यात आले होते. त्यानंतर दि. ०१.०७.२०१७ पासुन प्रत्येक महीन्याला व्याज आकारणी करून ती मुद्दलामध्ये मिळविण्यात येऊन त्यावर पुन्हा व्याजाची आकारणी करण्यात आलेली होती. दि. ०१.११.२०२० पर्यंत चक्र.वाढ व्याज पद्धतीने अर्जदाराकडे एकुण रक्कम रु. ८९,७७,१५०/- बाकी असल्याचे हिशोबामध्ये नमुद करण्यात आले होते. अर्जदाराने जमा केलेली रक्कम रु. २५,००,०००/- मिळून विनोद हरगोविंदजी झवर यांचा हिशोब रु.१,१४,७७,१५०/- झाला होता. विनोद हरगोविंदजी झवर यांनी मुद्दल रक्कम रु.३७,७७,६०८/- वर मासिक २.७५ टक्के दराने चक्र.वाढ व्याज आकारून एकुण व्याज रु. ७६,९९,५४२/- (अक्षरी शहाहत्तर लाख नव्यांन्युव हजार पाचशे बेचाळीस) आकारले होते. आपसात ठरल्याप्रमाणे अर्जदारा सोबत विनोद हरगोविंदजी झवर यांनी केलेल्या करारानुसार रु. ३७,७७,६०८/-(अक्षरी सदोतीस लाख सत्याहत्तर हजार सहाशे आठ) कर्जाचे रक्कमेवर द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने एका वर्षाचे व्याज रु.६,७९,९६८/- (अक्षरी सहा लाख एकोनएन्सी हजार नऊशे अडुसष्ठ) रुपये होत होते. तसेच साडेपाच वर्षाचे व्याज रु.३७,३९,८२८/- (अक्षरी सदोतीस लाख एकोणचाळीस हजार आठशे अठ्ठावीस रुपये) होत होते. मुद्दल मिळुन एकुण रक्कम रु.७५,१७,४३६/- (अक्षरी पंचाहत्तर लाख सतरा हजार चारशे छत्तीस रुपये) होत होती. त्यामधुन अर्जदाराने जमा केलेले रु. २५,००,०००/- (अक्षरी पंचवीस लाख रूपये) वजा करून अर्जदारा कडे व्याजासह एकूण रक्कम रु.५०,१७,४३६/- (अक्षरी पंन्नास लाख सतरा हजार चारशे छतीस रुपये) बाकी राहत होती. अर्जदाराने विनोद हरगोविंदजी झवर यांना कर्जावरील व्याजाचा दर द.सा.द.शे. १८ टक्के ठरला होता असे म्हटले असता, विनोद हरगोविंदजी झवर यांनी आम्ही मासीक ३ टक्के व्याज दराने रक्कम देतो व तोच दर ठरला होता असे म्हटले. त्यापेक्षा कमी व्याजदर आम्हाला परवडत नाही असे सांगीतले. जास्तीचे दराने व्याज आकारणी झाल्यामुळे अर्जदाराला दुप्पट व्याजाची रक्कम आकारल्या गेली त्यामुळे वाद निर्माण झाला. त्यावेळी अर्जदाराचे कुटूंबातील सदस्यांनी पुढील काळात पुन्हा फसवणुक होऊ नये व वाद वाढु नये म्हणुन व्यवहार त्याच दिवशी संपुष्टात आणण्याचे ठरविले.

13. त्यावेळी मध्यस्था समोर तडजोड होऊन व्याजात काही सुट देण्याचे ठरले. तसेच विनोद झवर यांचे व्याजासह रु. ६५,००,०००/- (अक्षरी पाशष्ठ लाख रूपये) देण्याचे ठरले तसेच दोन्ही खरेदीमध्ये चेक ने दिलेली रक्कम एकुण रु. ६७,८०,०००/- (अक्षरी संदुशष्ट लाख एन्सी हजार रूपये) ही रक्कम मिळवुन एकुण रु.१,३२,८०,०००/- (अक्षरी एक कोटी बत्तीस लाख एन्सी हजार रुपये) ही रक्कम प्लॉट ची किंमत रु. २,२५,५६,६००/- (अक्षरी दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे रुपये) मधुन वजा करून राहीलेली रक्कम रू. ९२,७६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) विनोद झवर यांनी अर्जदाराला एका महीण्यात देण्याचे कबुल केले. म्हणून अर्जदाराने दि २५.१.२०२१ रोजी तलाठी खडकी बु. यांचे कडे रीतसर अर्ज केला जो त्यांना दि २७.१.२०२१ रोजी मिळाला. सदर अर्ज प्रकरणात पान क्र. १५३ वर आहे.

14. अर्जदाराने विनोद हरगोविंदजी, झवर यांना दि.०७.०२.२०२१ रोजी राहीलेली रक्कम रु ९२,१६,६००/- (अक्षरी ब्यान्युव लाख शहाहत्तर हजार सहाशे रुपये) ची मागणी केली. परंतु विनोद हरगोविंदजी झवर यांने कर्जाचा हिशोब व्याजासह बरोबर झाला व आता आमच्याकडे कोणतीही रक्कम देणे राहीलेली नाही. तुमचे कागदपत्र लेटरपॅड, सह्या केलेले कोरे चेक व वडीलांची इसारचिठ्ठी परत दिलेले आहेत. प्लॉट तुम्ही खरेदी करून दिलेला आहे. त्यामुळे व्यवहार पुर्ण झाला कोणतीही रक्कम मिळणार नाही तुम्हाला जे करावयाचे असेल ते करा या नंतर रक्कमेची मागणी करावयाची नाही तसेच फोन सुद्धा करावयाचा नाही असे स्पष्ट सांगीतले.

15. विनोद हरगोविंदजी झवर यांनी अर्जदाराची अवैध सावकारी व्यवहारातून फसवणूक व विश्वासघात करून २,२५,५६,६००/-(अक्षरी दोन कोटी पंचवीस लाख छप्पन हजार सहाशे रुपये) किंमतीची मालमत्ता फक्त रु.६७,८०,००० (अक्षरी सदुसष्ठ लाख एन्सी हजार रूपये) मुद्दल रक्कम व त्यावरील व्याजात हडप केली. त्यामुळे अर्जदाराला सदर तक्रार दाखल करण्या शिवाय अन्य पर्याय राहीला नाही.

16. सदर प्रकरणात अर्जदाराने सर्व कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच अर्जदाराने स्वतः साक्ष दिली आहे. तसेच इतर साक्षीदार सुद्धा प्रकरणात हजर करून त्यांची साक्ष दिली आहे. अर्जदाराने त्याचे तक्रारीच्या संबंधाने दिलेली साक्ष ही अबाधित आहे व त्यात गैर अर्जदाराने त्यांचे तर्फे घेतलेल्या उलटतपासणी दरम्यान कोणतीही ठळक बाब अर्जदाराचे तक्रारी विरुद्ध आढळून आली नाही. म्हणजेच अर्जदाराची तक्रार ही खरी व बरोबर आहे हे सिद्ध होते.

17. तसेच प्रकरण चालू असताना प्रकरणातील एक गैरजदार म्हणजेच विनोद झवर जे मुख्य गैरअर्जदार आहेत ते हजर असून सुद्धा त्यांनी स्वतः तक्रारीच्या विरोधात स्वतःची कोणतीही साक्ष दिलेली नाही किंवा अर्जदाराची तक्रार खोटी असल्याबाबत कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत. यावरून गैर अर्जदाराने म्हणजेच विनोद झवर यांनी अर्जदाराचे संपूर्ण म्हणणे मान्य केले आहे असे दिसते. तसेच विनोद झवर हे तिन्ही खरेदीखतावर साक्षदार आहेत, यावरून या व्यवहारात ते सामील आहेत व त्यांचे सांगणे प्रमाणे हे व्यवहार झाले हे सिद्ध होते. तसेच अर्जदाराने दाखल केलेले कम्प्युटर स्टेटमेंट हे त्यातील नमूद दिनांक व रक्कम हे जुळल्यामुळे सदर स्टेटमेंट हे विनोद झवर यांनी अर्जदाराला दिलेले आहेत असे स्पष्ट होते. इतकेच नव्हे तर अर्जदाराच्या साक्षदराने हे स्पष्ट कथन केले की विनोद झवर यांचे कडून रोख रक्कम अर्जदाराने घेतांना ते सोबत होते व त्यांचे समक्ष रकमा रोख दिल्या आहेत. ही बाब सुद्धा विनोद झवर यांनी साक्ष देवून नाकारली नाही. म्हणून अर्जदाराचे सावकारी बाबतचे सर्व कथन सत्य आहे हे सिद्ध होते.

18. गैर अर्जदाराने त्यांचे म्हणणे (जबाब) नुसार कोणतेही दस्त दाखल केलेले नाहीत. तसेच लेखी जबाब हा दोन्ही गैर अर्जदारांनी संयुक्त दाखल केला आहे, व गैर अर्जदार क्र. १ हे हुंडी चिठ्ठी चा व्यवसाय करतात हे कबुल केले आहे. (पान क्र. २२४). परंतु हुंडी चिठ्ठी च्या व्यवसायाचा परवाना त्यांचे कडे नाही. तसेच जबाबातील परिछेद क्र. ३ मध्ये हे स्पष्ट लिहिले आहे की "खरेदी झाल्या बरोबर अर्जदार क्र. १ व २ यांनी सदर मालमत्तेचा ताबा घेतला होता". परंतु कार्तिक साव यांनी त्यांचे उलट तपासणीत हे कबूल केले की सदर दोन्ही प्लॉट त्यांचे ताब्यात नाहीत. या वरुण गैर अर्जदार सावकारी करतात हे स्पष्ट आहे.

19. तसेच जबाबातील परिछेद क्र. ६ मध्ये गैर अर्जदार यांनी कबुल केले की प्लॉट क्र. १५ बाबत त्यांना सर्व माहिती होती, व त्यांचेच सहमतीने सदर प्लॉट विकण्यात आला. जबाबातील परिछेद क्र. १२ मध्ये गैर अर्जदार यांनी कथन केले की प्लॉट क्र. १५ बाबतची नोटरी त्यांनी अर्जदार क्र. १ यांचे व अनेक ठिकाणचे कर्ज असल्याने व लिलावात जावू नये म्हणून केली होती. परंतु या कथनाचे पुष्ट्यर्थ कोणतेही दस्तावेज, पुरावा दाखल केला नाही. तसेच जबाबातील परिछेद क्र. १४ मध्ये गैर अर्जदार यांनी कथन केले की अर्जदाराने दाखल केलेले स्टेटमेंट हे खोटे आहे व त्यावर सही नाही, परंतु जेव्हा सदर स्टेटमेंट मधील नोंदी घटना नुसार जुळतात आहेत, तेव्हा त्याबाबत गैर अर्जदार क्र. १ यांनी ते खोटे असल्या बाबत स्वताः पुरावा देणे गरजेचे होते. गैर अर्जदार क्र. १ व २ चा जबाब गैर अर्जदार क्र. १ यांच्या प्रतिज्ञा लेखावर दिला आहे, तरीही त्यांनी पुरावेदार प्रकरणात म्हणून भाग घेतला नाही.

20. गैर अर्जदार क्र. १ यांनी हेतुपुरस्सर पुरावा देण्याचे टाळले, कारण त्यांनी खऱ्या अर्थाने अर्जदाराला लुटले आहे, व अवैध सावकारी करून अर्जदाराची बहुमूल्या मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच गैर अर्जदार क १ व पुरावेदार हेमेंद्र अग्रवाल यांचे मध्ये न्यायालयात वाद सुरू आहेत, व सदर वाद है व्याजाने दिलेल्या रकमे बाबत आहेत. ह्या बाबी पुराव्यात येवू नये म्हणून गैर अर्जदार क्र. १ यांनी प्रकरणात हजर राहून सुद्धा स्वता पुरावा दिला नाही.

21. तसेच प्रकरणात मूळ खरेदीखत सुद्धा दाखल केले नाहीत. यावरून हे स्पष्ट होते की गैर अर्जदाराने व्याजाच्या रकमेपोटी सावकारी पद्धतीने अर्जदाराचा बहुमूल्य प्लॉट/मालमत्ता अतिशय कमी रकमेत हडप केलेला आहे. गैरअर्जदाराची ही कृती स्पष्टतः सावकारी पद्धत आहे, त्यामुळे सर्व गैर अर्जदार हे स्पष्टपणे सावकारी करतात हे सिद्ध होते. त्यामुळे अर्जदाराकडून जबरदस्तीने करून घेतलेले दोन्ही खरेदी खत रद्द होण्यास पात्र आहेत तसे ते रद्द करून देण्याचे आदेश विद्यमान न्यायालयाने द्यावेत. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या आर्थिक अडचणीचा फायदा घेऊन त्याची बहुमूल्य मालमता हडप करण्याचा प्रयत्न केला.

22. सदर प्रकरणात गैरअर्जदारा तर्फे पुरावेदारा ने (गैरअर्जदार क्र. २) उलटतपासणी दरम्यान हे कबूल केले की त्यांनी सदर मालमता विकत घेण्याआधी कधीही बघितलेली नाही. तसेच मालमतेचे कोणतेही दस्ताऐवज बघितले नाहीत. तसेच त्यांनी खरेदी खतात नमूद खरेदी रक्कम कशी उभी केली याबद्दल सुद्धा यथोचित उत्तरे देऊ शकले नाहीत. तसेच सदर मालमता कुठे आहे, त्याच्या चतु:सीमा काय आहेत किंवा ती कोणाच्या मालकीची आहे हे सुद्धा खरेदी घेण्याआधी बघितलेले नाही.

तसेच खरेदी खतातील मालमत्ता कोणाच्या ताब्यात आहे हे सुद्धा खरेदीदार म्हणजेच पुरावेदार (गैर अर्जदार क्र. २) सांगू शकले नाहीत या सर्व बाबींवरून हे स्पष्ट होते की सदर खरेदी व्यवहार हा नाममात्र होता व तो सावकारी व्यवहार होता. आजही सदर मालमता अर्जदाराचे ताब्यात व नावात आहे, या वरुन हे स्पष्ट होते की सदर खरेदी व्यवहार हा सावकारीचा होता.

23. सदर प्रकरणात अर्जदाराने लिलादेवी साव (अग्रवाल) यांचे बद्दल कथन केले आहे, तसेच त्यांना व गैर अर्जदार क्र. १ यांना पुरावेदार म्हणून बोलवण्या करिता अर्ज दाखल केला होता, जेणे करून सर्व गोष्टी न्यायाच्या दृष्टीने समोर याव्या, परंतु गैर अर्जदार यांनी त्यास नकार दिला. यावरून हे स्पष्ट होते की लिलादेवी साव यांचा भाडेकरी असलेला व थकीत भद असलेला फ्लॅट अर्जदाराला जबरदस्तीने विकत घेण्यास गैर अर्जदार क्र. १ यांनी भाग पाडले. अर्जदार हा बांधकाम व्यवसाई असल्याने बरेच फ्लॅट व दुकाने त्यांचे मालकीचे आहेत, त्यामुळे नवीन फ्लॅट तोही थकीत भाडेकरी असलेला फ्लॅट घेणे शक्य नाही, तरीही जबरदस्तीने फ्लॅट विकत घ्यावा लागला, म्हणू सदर व्यवहार सुदधा सावकारीचाच व्यवहार आहे.

24. अर्जदाराने दाखल केलेले दस्त बघितले असता हे सिद्ध होते की गैर अर्जदार क्र. १ व २ यांनी सावकारीचा व्यवहार केला आहे. अर्जदारा जवळ सर्व दस्त मूळ प्रतीत आहेत, व ते केव्हाही दाखल करू शकतो. गैर अर्जदार क्र. १ व २ हे त्यांचा बचाव करू शकले नाही, तिन्ही खरेदी खतावर गैर अर्जदार क्र. १ ची साक्ष आहे, यावरून हे व्यवहार एकाच सावकारी व्यवहाराचा भाग आहेत हे सिद्ध होते.

25. म्हणून अर्जदार विनंती करतात की, सदर प्रकरणात गैर अर्जदार क्र. १ व २ यांचे विरुद्ध आदेश पारित करून ते अवैध सावकारी करतात हे घोषित करावे, व तसेच प्रकरणातील सर्व खरेदीखत अवैध घोषित करून रद्द करण्यात यावे. तसेच गैर अर्जदार क्र. १ व २ यांचे विरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यात यावी.

**गैरअर्जदारांतर्फे त्यांचे अधिवक्ता लेखी युक्तीवाद सादर करतात तो येणे प्रमाणे :**

१. अर्जदार हयांनी गैरअर्जदार क. १ व २ हे अवैध सावकारी धंदा करतात असे घोषित करावे व गैरअर्जदार क. १ व २ यांनी अर्जदार क. १ यांच्याकडून कर्जाउ रकमेस गहाणतारण व सुरक्षितता म्हणून घेतलेले दि. १२/०५/२०१५ रोजीची नाममात्र भरणा पावती व खरेदीखताचे दस्त क. ३७७८/२०२० व दस्त क. २१९/२०२१ हे दोन्ही दस्त अवैध घोषित करुन रद्द करण्यात यावे व गैरअर्जदारांविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तकारीमधील संपूर्ण मजकुर वाचला असता अर्जदार/तकारकर्ता हयांनी गैरअर्जदार क. १ यांच्याविरुध्द नमूद केलेल्या गहाणाच्या सत्यतेबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही उलटपक्षी खालीलप्रमाणे अर्जदार क. १ याने उलटतपासामध्ये ज्या बाबी स्पष्टपणे मान्य केल्या आहेत त्या वाचल्या असता अर्जदार व गैरअर्जदार क. १ हयांच्यामध्ये सावकारीचा व्यवहार असल्याचे सिध्दच होवू शकत नाही जेव्हा की, ही बाब सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी ही अर्जदार हयांच्यावर आहे. परंतु संपूर्ण कागदपत्रांचे विशेषतः तकारीचे व अर्जदारांच्या उलटतपासा मधील त्यांनी मान्य केलेल्या खालील बाबी लक्षात घेतल्या असता अर्जदार व गैरअर्जदार हयांच्यामध्ये कोणताही सावकारीचा व्यवहार असल्याचे सिध्दव होवू शकत नाही.

२. गैरअर्जदार क. १ यांच्यावर केलेल्या आरोपाला अनुसरुन लेखी युक्तीवाद सादर करण्यात येतो तो येणेप्रमाणे- अर्जदाराने गैरअर्जदार क. १ हयांच्या विरुध्द विशेष कर्जाच्या रकमेचा व्यवहाराचा उल्लेख तकारीमध्ये केलेला आहे. परंतु त्या तकारीमधील संपूर्ण मजकुर वाचला असता तक्रार दाखल करण्यापूर्वी, दाखल केली त्या दिवशी व त्यानंतर देखील अर्जदार व गैरअर्जदार क. १ हयांच्यामधील नमूद केलेल्या व्यवहारा बाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही व नमूद केलेल्या घटनेनुसार अर्जदार व गैरअर्जदार क. १ हयांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा सावकारी व्यवहार असल्याचे नमूद देखील केले नसून इतर लोकांशी गैरअर्जदार क. १ यांचा काय व्यवहार आहे हेच नमूद केले आहे, त्यामुळे सदरहू आरोपांच्या आधारावर अर्जदार हयांनी गैरअर्जदार क. १ यांच्या विरुध्द केलेल्या तकारी नुसार अर्जदार व गैरअर्जदार हयांच्यामध्ये सावकारी व्यवहार असल्याबाबत कोणतीही स्पष्टता अथवा कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केलेला नसल्यामुळे सिध्दच होवू शकत नाही.

३ अर्जदाराचा उलटतपास वाचला असता अर्जदार हे उच्च शिक्षीत आहेत. ते बांधकामाचा व्यवसाय करतात. बांधकामाचा व्यवसाय लक्षात घेतला असता त्यांनी गैरअर्जदार क. १ कडून उल्लेखित केलेल्या रकमांचे कागदोपत्री पुरावा, सदरचा व्यवहार खरच झाला असल्यास सहजरित्या दाखल करु शकला असता, त्याबाबत अर्जदाराने एकही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही उलटपक्षी उलटतपासामध्ये खालील बाबी मान्य करुन नमूद व्यवहारा बाबत तसा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल

केलेला नसून तशा प्रकारचा कागदोपत्री पुरावा अर्जदाराजवळ असणे हे अपेक्षित आहे व ही बाब त्याने उलटतपासामध्ये दे मान्य केलेली आहे. त्याबाबत उलटतपासा मधील खालील अर्जदाराने मान्य केलेल्या बाबी येणेप्रमाणे

ज्या नावाने व्यवसाय करतो त्याचा प्रोप्रायटर म्हणून बँक खाते उघडण्यात आलेले आहे. सदरहू खाते २०१५ पू पासूनचे आहे. सदरहू खात्याकरीता धनादेश पुस्तिका प्राप्त करण्यात आलेल्या आहेत. माझ्या पत्नीचा माझ्या व्यवसायाश कोणताही संबंध नाही. विनोद झंवर यांनी तकार मधील नमुद धनादेश अनादरीत झाल्याबाबत कुठलीही फिर्याद दाखल केली नाही हे म्हणणे खरे आहे. तक्रारीत नमूद केलेले धनादेश हे अर्जदार क. २ हिच्या ताब्यात आहेत हे म्हणणे खरे आहे. सदर व्यवसायामध्ये झालेल्या उत्पन्न समजण्याकरीता जमा खर्चाच्या नोंदी केल्याशिवाय कळू शकत नाही याबाबत मी काहीही सांगू शकत नाही. सन २०१५ पासून फर्मचे आयकर विवरणपत्र शोधून दाखल करु शकतो. आयकर विवरणपत्रासाठी C.A. यांना द्यावयाची माहिती स्वतः दिलेली आहे. आयकर विवरण पत्राची माहिती C.A. यांना देतेवेळी तकारीत नमूद विनोद झंवर यांचेकडून घेतलेल्या रक्कमेबाबतची माहीती रोख रक्कम घेतल्याने दिलेली नाही. तकारीत नमूद केलेल्या रक्कमेबाबतच्या कोणतीही नोंद माझेकडे नाही. उत्तर मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या तक्रारीमध्ये विनोद झंवर यांचेकडून माझ्या म्हणण्याप्रमाणे दयावयाची रक्कम वसूल करावी म्हणून सदरच्या तकारीमध्ये मागणी केलेली नाही.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीमधील परिच्छेद क. २ मध्ये अर्जदार क. १ यांचे वडील ज्यांचा मृत्यू झालेला आहे, नामे जानकीलाल बन्सीलाल सोमाणी हयांचेसोबत गैरअर्जदार क. १ यांनी त्यांच्या मालकीचा मौजा खडकी बु. येथील शेत सर्व्हे नं. ४३/१, प्लॉट क. १५ खुला प्लॉट इसारविठ्ठी स्थावरची भरणा पावती नोटरी करून नोंदवून घेतला असे नमूद करुन त्याबाबतचा इतर उल्लेख तकारीत केला आहे, जो पूर्णपणे प्रथमदर्शनी खोटा व चुकीचा असल्याचे सिध्द होत आहे याचे विशेष कारण म्हणजे संदर्भात भरणा पावती ही विः न्यायालयासमक्ष पुराव्याच्या कायदयानुसार सिध्द केलेली नाही व त्याबाबतचा स्पष्ट कागदोपत्री पुरावा देखील वि. न्यायालया समक्ष सादर केलेला नाही त्यामुळे फक्त तकारीमधील आरोपांच्या आधारावर गैरअर्जदार क. १ यांच्या विरुध्द कोणताही आदेश मागणीप्रमाणे पारीत करणे हे कायदयातील तरतुदीनुसार अशक्य आहे.

इतकेच नव्हेतर अर्जदार क. १ यांनी त्यांचा उलटतपास घेतेवेळी सदरहू व्यवहाराबाबत मान्य केलेली विधाने लक्षात घेतली असता तक्रारीत नमूद केलेला व्यवहार हा अर्जदाराने नमूद केल्याप्रमाणे झाला होता व तो पूर्णत्वास गेला किंवा नाही याबाबतचा कुठलाही स्पष्ट उल्लेख तकारीत न केल्यामुळे ते सर्व आरोप खोटे व चुकीचे असल्याचे सिध्द होत आहे. त्याबाबत अर्जदार क. १ यांनी त्यांच्या उलटतपासात नमूद केलेली बाब येणेप्रमाणे तकार दाखल करतेवेळी प्लॉट क. १५ चे मालक कोण आहेत याबाबत चौकशी केली होती का? उत्तर वडीलांनी ममला सदर प्लॉट विकल्याचे सांगितले, मी स्वतः चौकशी केलेली नव्हती.
हे म्हणणे खरे आहे की, वडील जीवंत असेपर्यंत त्यांनी सदर प्लॉटबाबत / व्यवहाराबाबत कुठेही / कोणाकडेही तक्रार दाखल केलेली नव्हती. विनोद झंवर यांनी वडील जिवंत असेपर्यंत किंवा आजपर्यंत सदर प्लॉटबाबत कोणताही वाद उत्पन्न केलेला नाही हे म्हणणे खरे आहे. माझे वडीलांच्या मालकीचा प्लॉट क. १५ हा वडीलांनी विकी केला हे मला माहीती नाही. याबाबतचा पुराव्या मधील उल्लेख केलेला बरोबर आहे. परंतु तो कोणाला विकी केला हे मला आठवत नाही.

५. अर्जदार क. १ यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये अर्जदार क. २ हिने गैरअर्जदार क. १ हयांना कर्जाच्या रकमेपोटी ९ लेटरहेडवर प्रत्येकी रुपये ५,००,०००/- (पाच लाख) मिळाल्याचे लिहून घेतले व अर्जदार क. २ हिने गैरअर्जदार क. १ यांना दि अकोला अर्बन को.ऑप. बँक लि. अकोलाचे १० धनादेश त्यांच्या नावाने सही करुन दिल्याचे नमूद केले आहे, परंतु ते सर्व धनादेश हे गैरअर्जदार क. १ यांना दिल्याबाबतचा कुठलाही कागदोपत्री पुरावा वि. न्यायालयासमक्ष सादर केला नाही. आरोप सिध्द करण्याच्या उद्देशाने त्याबाबतचा कोणताही तोंडी पुरावा देखील सादर केला नाही अथवा धनादेश पुस्तिकेवर त्याबाबतची नोंद केली असल्याबाबतचा देखील कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. सदरहू धनादेश हे अर्जदार क. २ हिच्याच ताब्यात असल्याबाबतचे स्पष्टपणे अर्जदार क. १ व २ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये स्पष्टपणे मान्य केले असल्यामुळे अशाप्रकारचे तकारीत नमूद धनादेश हे गैरअर्जदार क. १ यांना दिले हे म्हणणे सपशेल खोटे व चुकीचे असल्याचे त्यांनी उलटतपासात दिलेल्या मान्यतेवरुन निर्विवादपणे सिध्द होत आहे. तकारीमधील प्रत्येक आरोप हा पूर्णपणे बिनबुडाचा व खोटा असून केलेल्या आरोपानुसार त्याबाबतचा संपूर्ण कागदोपत्री पुरावा हा अर्जदार हयांच्याकडे असणे अपेक्षित आहे, परंतु तसा कुठलाही कागदोपत्री पुरावा सादर न करता तकारीत आरोप केलेले व उल्लेखीत केलेले धनादेश हे अर्जदारांच्याच ताब्यात असल्याचे दोन्ही अर्जदारांनी उलटतपासामध्ये स्पष्टपणे मान्य केले असल्यामुळे दाखल केलेली तकार ही पूर्णपणे खोटी व चुकीची असल्याचे निर्विवादपणे सिध्द होत आहे. अर्जदारांचे

गैरअर्जदार क. १ यांचेशी असलेले मित्रत्वाचे संबंध सामाजिक व घरगुती कारणास्तव दुरावले गेले असल्यामुळे गैरअर्जदार क. १ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सदरची खोटी तकार अर्जदारांनी दाखल केल्याचे निर्विवादपणे सिध्द होत आहे. अर्जदार हयांनी गैरअर्जदार क. १ यांच्यासोबत नमूद केलेल्या व्यवहाराबाबत ते व्यवहार कर्जाचे व व्याजाच्या स्वरुपातील होते हे सिध्द करण्याकरीता त्यांच्याशी झालेला कोणताही करार, ठेवपावती अथवा इतर उल्लेखित कागदपत्रे वि. न्यायालयासमक्ष दाखल केलेली नाहीत, जेव्हा की, ती संपूर्ण कागदपत्रे ही तकारीतील आरोपानुसार अर्जदार हयांच्या ताब्यात असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. परंतु ती कागदपत्रे दाखल न करता तोंडी स्वरुपात केलेले आरोप हे कायदयातील तरतुदीनुसार सिध्द होयू शकत नाही व ती बाब अर्जदारांनी वि. न्यायालया समक्ष सिध्द देखील केलेली नसल्यामुळे त्यांनी केलेली तकार खोटी व चुकीची असून अर्जदार हयांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचा आदेश पारीत करण्यात यावा, हि विनंती.

गैरअर्जदार क. १ यांच्यावर केलेल्या आरोपाला अनुसरुन लेखी युक्तीवाद सादर करण्यात येतो तो येणेप्रमाणे:- हे म्हणणे बरोबर आहे कि, विनोद झवर यांचेशी मित्रत्वाचे घनिष्ठ संबंध होते ते आज रोजी संपुष्टात आले आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की जवळपास २०२१ पासून माझे मित्रत्वाचे संबंध तुटले आहेत. हे म्हणणे बरोबर आहे कि, तकारीमध्ये नमुद नुसार कार्तिक साव यांचेसोबत माझे त्यांचे सोबत इतर संबंध नाही व व्यवहार सुध्दा नाही. कार्तिक सोबत झालेल्या विकीची मालमत्ता हि माझ्या मालकीची होती. मी कार्तिक साव यांना मालमत्ता विकली नसुन गहाण ठेवली होती. मी कार्तिक साव यांना खरेदीखत करुन दिले. साक्षीदार स्वतःहून सांगतात कि विनोद झंवर यांचे सांगणेवरुन खरेदीखत करुन दिले. हे बरोबर आहे कि, कार्तिक साव यांना विकलेल्या मालमत्तेशी विनोद झंवर यांचा संबंध नाही. कार्तिक साव यांना दिलेल्या मालमत्तेसंबंधी त्यांनी दिलेला धनादेशद्वारे रक्कम मिळाली तो धनादेश मी वटवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांचेकडून त्याचदिवशी फ्लॅट विकत घेतला होता. हे बरोबर आहे की लिलादेवी अग्रवाल ही साव यांची आई आहे.वरील नमूद केलेला उलट तपासातील मजकुर वाचला असता अर्जदार हे गै.अ. हयांचे विरूध्द ते सावकारी करतात अश्या प्रकारची कोणतीही केस सिध्द करू शकलेले नाही हे स्पष्टपणे दिसून येत आहे.

७. अर्जदार क.१ यांनी गै.अ. चा उलट तपास करतेवेळी अर्जदार व गै.अ. यांच्यामधील नमूद केलेला व्यवहार हा सावकारी स्वरूपाचा आहे अथवा सदरहू सावकारी व्यवहार कश्याप्रकारचा असून तो सावकारी संज्ञेमध्ये दिसून येत असल्याबाबत कोणत्याही प्रकारचा उलट तपास घेतलेला नाही. प्रसिध्द न्यायनिवाडयानुसार जोपर्यंत अर्जदार हे गै.अ. सोबत असलेला व्यवहार हा सावकारी स्वरूपाचा आहे ज्यामध्ये व्याजाच्या रक्कमेची देवाणघेवाण झाली, तशी रक्कम अर्जदाराने गै.अ.ला दिली, व्याजाचा दर काय होता, केव्हा केव्हा व्याजापोटी रक्कम दिली हयाबाबतचा कुठलाही उलट तपास जो हया तकारीप्रमाणे अर्जदाराची प्रार्थना मंजुर करण्यास आवश्यक व अर्जदारावर बंधनकारक आहे अशी बाब विचारत नाही तोपर्यंत गै.अ. ने घेतलेला बचाव खरा आहे असे समजण्यात यावे, त्या न्यायनिवाडयाची प्रत या युक्तीवादासोबत जोडण्यात आली असून सदरच्या अर्जदार क.१ याने घेतलेल्या उलट तपासात ही बाब त्याने साक्षीदारास विचारली देखील नाही, हयावरून अर्जात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार व गै.अ. हयांचेमधील व्यवहार हा सावकारी स्वरूपाचा आहे, हे म्हणणे अशक्य आहे.

८. अर्जदार क.१ तर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधील खालील मजकूर येणे प्रमाणे :- वादातील खरेदीखताची किंमत ही फर्मच्या खात्यातून अदा करण्यात आली, आता मी सांगतो की, खरेदीखताचे खरेदीखतात नमूद रक्कम मला फर्मने दिली व ती मी माझ्या खात्यातून प्रकाश सोमानी यांना दिली. सदर रक्कम मी फर्मला परत केली आहे. हे मला आठवत नाही. हा उलट तपासातील मजकूर वाचला असता अर्जदार क.१ हयाने अर्जातील नमूद केलेले खरेदीखत मान्य असून त्या खरेदीखताची पुर्ण रक्कम अर्जदार क.१ यांना खरेदीमध्ये नमूद केल्याप्रमाणे धनादेशाव्दारे प्राप्त झाली हे सिध्द होत आहे. ज्या खरेदीखताच्या रक्कमेचा भरणा धनादेशाव्दारे प्राप्त झाली असता सदरचा व्यवहार हा सावकारी व्यवहार आहे, हे म्हणणे अशक्य आहे.

वर नमूद केलेल्या उलट तपासानुसार प्रकाश सोमानी यांनी वादातील मालमत्तेचे खरेदीखत नोंदवून दिल्याचे अर्जदार क.१ यांनी मान्य केल्यानंतर त्याच खरेदीखताबाबत पुढील उलटतपासात अर्जदार क.१ वादातील मिळतीचे मालक नव्हते, अश्या प्रकारचा उलट तपास खालील प्रमाणे नोंदल्या गेला :- हे म्हणणे खोटे आहे की, वादातील मिळकतीचे मालक प्रकाश सोमानी नव्हते.

हा उलट तपास वाचला असता अर्जदाराने स्वतःच वादातील तकारीबाबत वेगवेगळा बचाव घेतला असून कोणताही ठोस बचाव तकारीमधील किंवा उलट तपासामध्ये घेतलेला नाही. हयावरून अर्जदार क.१ हाच वादातील व्यवहाराबाबत संभ्रम निर्माण करत असल्याने त्याने मागणी केल्याप्रमाणे त्याची तकार मंजूर करणे कायद्यातील तरतुदीनुसार अशक्य आहे. अर्जदार क.१ तर्फे घेण्यात आलेला उलट तपास वाचला असता अर्जदाराने वादातील व्यवहार हद्या सावकारी व्यवहार असल्याबाबत म्हणजेच

कर्जाच्या रक्कमेच्या देण्या घेण्याबाबत कुठलाही उलट तपासात गै.अ. हयांना विचारणा करण्यात आली नाही, हयावरून वरील प्रसिध्द केलेल्या न्यायनिवाडयानुसार वादातील व्यवहार हा सावकारी होता हे म्हणणे अशक्य आहे.

९. अर्जदार क.१ तर्फे गै.अ. हयांच्या घेण्यात आलेल्या उलट तपास वाचला असता सदरहू उलट तपासात वादातील खरेदीखताची किंमत ही अर्जदार क.१ हयांना मिळाली असल्याचे स्पष्टपणे कबुल केले असून सदरहू व्यवहाराबाबत कुठलाही आक्षेप अर्जदारांतर्फे घेण्यात आलेला नाही, त्यामुळे वादातील व्यवहार हा सावकारी स्वरूपाचा आहे हे म्हणणे सपशेल खोटे व चुकीचे ठरते. अर्जदाराने दाखल केलेल्या तकार अर्जातील परिच्छेद क.५ मधील मजकुर वाचला असता वादातील व्यवहार करते दिवशी म्हणजे दि. ०५/११/२०२० रोजी गै.अ.क.२ यांची, आजी नामे लिलादेवी अग्रवाल यांच्याकडून अर्जदाराने फ्लॅट विकत घेतला व तो विकत घेतल्याबाबत स्पष्ट उल्लेख तकारीमध्ये केलेला आहे व त्याच दिवशी गै.अ.क.२ याने देखील अर्जदार यांच्याकडून वादातील खरेदीनुसार प्लॉट विकत घेतला आहे, ही बाब लक्षात घेतली असता वादातील व्यवहार सावकारी आहे, असे अर्जदारांना म्हणावयाचे असल्यास त्यांनी सौ. लिलादेवी यांच्यासोबत झालेल्या व्यवहाराबाबत देखील आक्षेप नोंदावयास पाहिजे होता परंतू तसा कुठलाही आक्षेप न घेता अर्जदार व त्यांचे तर्फे घेण्यात आलेल्या पुरावेदारांनी उलट तपासात दि.०५/११/२०२० रोजीचे अर्जदार, गै.अ. व त्यांची आजी लिलादेवी अग्रवाल यांच्यामधील झालेले व्यवहार हे अदला बदलीबाबत असल्याचे मान्य केल्याचे दिसून येत आहे. हयावरून वादातील अंशतः व्यवहार हे सावकारी आहे व इतर व्यवहार हे सावकारी नाही, हे म्हणणे पुर्णपणे गैरकायदेशीर व चुकीचे ठरू शकते. वर नमूद केल्याप्रमाणे अदलाबदलीचा व्यवहार लक्षात घेतला असता अर्जदार हे न्यायालयासमक्ष खोटे बोलत असून फक्त स्वतःचा फायदा होईल, तोच व्यवहार सावकारी आहे, असे नमूद करत आहेत व त्याच दिवशी गै.अ.क.२ यांच्या आजी लिलादेवी अग्रवाल हयांच्यातील झालेला व्यवहार हा सावकारीचा नाही असे नमूद करत नाहीत, त्यावरूनच ते न्यायालयासमक्ष स्वच्छ हाताने आले नसून न्यायालयाची दिशाभुल करत आहे, हे स्पष्टपणे दिसून येते, त्यामुळे अर्जदाराने दाखल केलेली तकार ही पुर्णपणे खोटया स्वरूपाची असून न्यायालयाची दिशाभुल करून खोटी साक्ष न्यायालयासमक्ष नोंदली असल्याचे दिसून येत असून अश्या प्रकारे न्यायालयासमक्ष आलेल्या तकारकर्त्यास म्हणजे अर्जदारास कोणतीही दाद देता येवू शकत नाही. त्यामुळे हया सर्व कारणास्तव अर्जदाराचा तकार अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा व न्यायाच्या दृष्टीने इतर योग्य तो आदेश पारित करण्यात यावा, ही नम्र विनंती, करीता गै.अ. तर्फे सदरचा लेखी युक्तीवाद.

**सदर प्रकरणातील वस्तुस्थिती**

- अर्जदार यांचे वडील श्री. जानकीलाल बन्सीलाल सोमाणी व गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांचेत दि. १२.०५.२०१५ रोजी मौजा खडकी बु. प्र. ता. जि. अकोला हददीतील सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट नं. १५ मधील ६२९.१४ चौ. मी. (६७६९.५४ चौ. फुट) बाबतची स्थावरची भरणा पावती रुपये २५,००,०००/-च्या व्यवहारापोटी नोटरी केल्याचे दिसून येते.
- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव यांना दस्त क्र. ३७७८/२०२० अन्वये दि. ०५.११.२०२० रोजी मौजा खडकी बु. प्र. ता. जि. अकोला हददीतील सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट नं. ७ मधील ९५२.९४ चौ. मी. (१०२५३.६३ चौ. फुट) पैकी ४८२.०६ चौ. मी. (५१८६.९६ चौ. फुट) अन्वये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे रु. ३४,२३,०००/- विक्री केल्याचे दिसून येते.
- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव यांना दस्त क्र. ३७७८/२०२० अन्वये दि. ०५.११.२०२० रोजी नोंदणीकृत खरेदीखतावर साक्षीदार म्हणून श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.
- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव यांना दस्त क्र. २१९/२०२१ अन्वये दि. ०७.०१.२०२१ रोजी मौजा खडकी बु. प्र. ता. जि. अकोला हददीतील सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट नं. ७ मधील ९५२.९४ चौ. मी. (१०२५३.६३ चौ. फुट) पैकी ४७०.८८ चौ. मी. (५०६६.६६ चौ. फुट) अन्वये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे रु. ३३,४४,०००/- विक्री केल्याचे दिसून येते.
- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव यांना दस्त क्र. २१९/२०२१ अन्वये दि. ०७.०१.२०२१ रोजी नोंदणीकृत खरेदीखतावर साक्षीदार म्हणून श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनीदि. २५/०१/२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. २ यांना उपरोक्त नमूद प्लॉट नं. ७ खरेदीखताद्वारे व्यवहाराची फेरफार नोंद घेण्यात येऊ नये घेतलेला आक्षेप अर्ज केल्याचे दिसून येते.
- अर्जदार यांचे वडील श्री. जानकीलाल बन्सीलाल सोमाणी यांनी दि. १३.०८.२०१९ रोजी दस्त क्र. १८५६/२०२० नोंदणीकृत इच्छा मृत्यू पत्राचा लेख केला असून सदर विवादीत मालमत्ता सर्व्हे नं. ४३/१ मधील प्लॉट नं. ७ मधील प्लॉट अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांचे नावाने दिल्याचे दिसून येते.
- अर्जदार क्र. २ श्रीमती जान्हवी प्रकाश सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांना त्यांच्या १० लेटरहेडवर आदित्य कॉर्पोरेशनमार्फत प्रत्येकी रू. ५,००,०००/- मिळाले असल्याबाबत नमूद केले असून त्यापोटी दि. ०१.०६.२०१५ रोजी धनादेश क्र. ०२४६३३ ते ०२४६४२ असे एकूण १० धनादेश प्रत्येकी रू. ५,००,०००/- दिल्याचे दिसून येते.
- अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी श्रीमती लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांना दस्त क्र. ३७६३/२०२० अन्वये दि. ०५.११.२०२० रोजी मौजा कसबे अकोला महानगरपालीका अकोलाचे हददीतील नझूल शीट नं. ७४ बी मधील रामा एम्पायर बिल्डींग बी मधील फ़्लॅट नं. बी-१०७ नोंदणीकृत खरेदीखताद्वारे रु. १६,००,०००/- रुपयात विक्री केल्याचे दिसून येते
- क्र. ३७६३/२०२० दि. ०५.११.२०२० अन्वये अन्वये नोंदणीकृत खरेदीखतावर साक्षीदार म्हणून श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.
- प्रकाश सोमाणी का हिसाब असे हस्ताक्षरात लिहीलेला संगणकीय स्टेटमेंट दाखल केले असून त्यात व्याजाचा उल्लेख नमूद आहे मात्र त्यावर कोणाचीही स्वाक्षरी नाही.
- आनंद इंटरप्रायसेसच्या लेटरहेडवर आदित्य कॉर्पोरेशन व झंवर सन्समार्फत विविध बँकेचे चेक मिळाल्याबाबतच्या नोंदी असलेल्या एकूण ३८ चिठठया आहेत तसेच सदर चिठठयांवर व्याजाचा उल्लेख नमूद असून सदर चिठठयांवर मागच्या बाजुने व्याजाचा हिशोब नमूद करण्यात आलेला आहे.
- गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांनी त्यांना वारंवार संधी देवूनही पुरावा व उलटतपासाकरीता हजर झालेले नाहीत.
- अनुजा सीडसच्या लेटरहेडवर आदित्य कॉर्पोरेशनमार्फत विविध बँकेचे चेक मिळाल्याबाबतच्या नोंदी असलेल्या एकूण १४ चिठठया आहेत तसेच सदर चिठठयांवर व्याजाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे.

**-: नि ष्क र्ष :-**

१. अर्जदार यांचे वडील श्री. जानकीलाल बन्सीलाल सोमाणी व गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांच्या सोबत आर्थिक व्यवहार होते असे दिसून येते.

२. अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव यांना यांना दस्त क्र. ३७७८/२०२० अन्वये दि. ०५.११.२०२० रोजी व दस्त क्र. २१९/२०२१ अन्वये दि. ०७.०१.२०२१ दस्त अन्वये तसेच अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी श्रीमती लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांना दस्त क्र. ३७६३/२०२० दि. ०५.११.२०२० अन्वये केलेल्या नोंदणीकृत खरेदीखतावर साक्षीदार म्हणून श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांनी स्वाक्षरी केलेली असून प्रत्येक व्यवहारात श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर साक्षीदार असणे हा केवळ निव्वळ योगायोग असू शकत नाही.

३. अर्जदार क्र. २ श्रीमती जान्हवी प्रकाश सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर त्यांच्या १० लेटरहेडवर आदित्य कॉर्पोरेशनमार्फत प्रत्येकी रू. ५,००,०००/- मिळाले असल्याचे नमूद असून सदर व्यवहारापोटी त्यांचेकडून गैरअर्जदार क्र. १ यांना तारीख नमूद नसलेले १० धनादेश दिलेले आहेत. सदर बाब गैरअर्जदार क्र. १ हे अवैध सावकारी करीत असल्याबाबत सिध्द करण्यास पुरेशी आहे.

४. अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी गैरअर्जदार क्र. २ श्री. कार्तिक विजय साव तसेच अर्जदार क्र. १ श्री. प्रकाश जानकीलाल सोमाणी यांनी श्रीमती लिलादेवी गणपतलाल अग्रवाल यांच्यातील दोन्ही नोंदणीकृत खरेदीखताचे व्यवहार एकाच दिवशी दि. ०५.११.२०२० रोजी झालेले असून त्यावर साक्षीदार म्हणून श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांची स्वाक्षरी आहे. सदरचे व्यवहार श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांच्या सांगण्यावरून झालेले आहेत अशी शक्यता नाकारता येत नाही.

५. गैरअर्जदार क्र. १ श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर यांना वारंवार संधी देवूनही ते स्वत: पुरावा व उलटतपासाकरीता हजर झालेले नाहीत यावरून त्यांचेविरूध्द अर्जदार यांनी घेतलेले आक्षेप त्यांना मान्य आहे निष्कर्षाप्रत येण्यास कोणतीच हरकत नाही.

६. श्री. विनोद हरीगोविंदजी झंवर हे आदित्य कॉर्पोरेशनमार्फत व्याजाचा व्यवहार करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

## -: अहवाल :-

अर्जदार व गैरअर्जदार यांनी प्रकरणात दाखल केलेले कागदपत्रे, लेखी जवाब, सदर प्रकरणाची वस्तुस्थिती व निष्कर्षाच्या आधारे अर्जदार, गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून कर्जाऊ रक्कम व्याजाने घेण्याचा व्यवहार करीत असल्याबाबत व गैरअर्जदार क्र. २ यांनी गैरअर्जदार क्र. १ यांचे प्रभावाने सावकारीच्या ओघामध्ये स्थावर मालमत्ता खरेदीखताद्वारे हस्तांतरण केल्याचे दिसून येते. यावरुन सदर प्रकरणातील अर्जदार यांचे तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे व गैरअर्जदार यांचेसोबत झालेला व्यवहार सावकारी व्यवहाराचे ओघामध्ये झाल्याचे दिसून येते.

करिता महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) अन्वये सदरचा अहवाल सविनय सादर करण्यात येत आहे.

(कु. ज्योती रू. मलिये)
**सावकाराचे निबंधक तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला.**

प्रति,
मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी :-**

१. श्री. प्रकाश जानकीराम सोमाणी, रा. सोमाणी अपार्टमेंट, रामदास पेठ, ता. जि. अकोला
२. सौ. जान्हवी प्रकाश सोमाणी, रा. सोमाणी अपार्टमेंट, रामदास पेठ, ता. जि. अकोला
३. श्री. विनोद हरगोविंदजी झवर, रा. "श्री व्यंकटेश" मुकूंद मंदिराजवळ, रामदास पेठ, ता. जि. अकोला.
४. श्री. कर्तिक विजय साव, रा. कामा प्लॉट, स्टेशन रोड, ता. जि. अकोला.

**सावकाराचे निबंधक तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका अकोला.**